POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०५ ● अंक-४९ ● मुंबई, रविवार,२१ सप्टेंबर २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

# त्र्यंबकेश्वरमध्ये पत्रकारांना मारहाण, मंत्रालयातून दखल घेत गंभीर गुन्हा दाखल; तिघांना अटक

**■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

देवस्थान आणि तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी होणाऱ्या बेकायदा, अनियमित पार्किंग वसुलीचा मुद्दा चांगलाच चर्चेत असतो. विशेष म्हणजे स्थानिक वसुलीदार अगदी खंडणी मागितल्यासारखी दमदाटी करुन भाविकांकडून पार्किंगची मनमानी वुसली करतात. नाशिक जिल्ह्यातील प्रसिद्ध ठिकाण असलेल्या त्र्यंबकेश्वरमध्ये आज शनिवारी धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. येथे इलेक्ट्रॉनिक मीडियाच्या पत्रकारांना काही गुंडांनी बेदम मारहाण केल्याची घटना घडली. या हल्ल्यात तीन ते चार पत्रकार गंभीर जखमी झाले असून, सध्या त्र्यंबकेश्वरच्या शासकीय रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. राज्यभरातून या घटनेचा तीव्र निषेध करण्यात आला असून मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांनी गंभीर दखल घेत आरोपींवर कडक कारवाई करण्याचे आदेश दिले होते. त्यानंतर, अखेर




पोलिसांकडून आरोपींविरुद्ध पत्रकार संरक्षण कायदा, जीवे मारण्याचा प्रयत्न तसेच दंगल माजवल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्र्यंबकमध्ये प्रवेश येथील स्वामी समर्थ कमानीजवळ फी वसुलीसाठी काही मुले ठेवण्यात आली आहेत. आज त्र्यंबकमध्ये होणाऱ्या साधू-महंत यांच्या बैठकीचे वार्तांकन करण्यासाठी हे पत्रकार गेले असता त्यांच्या गाड्या अडविण्यात आल्या. यावेळी पत्रकारांनी आम्ही बैठकीच्या वार्तांकनासाठी चाललो आहोत, असे सांगितले. त्यावेळी पावती फाडणाऱ्यांकडून गाड्या बाजूला घेण्यास सांगत तुम्ही पत्रकार किंवा कोणीही असला तरी आम्ही तुमच्या गाड्या सोडणार नाही, असे फर्मान सोडले.

दरम्यान प्रचंड गोंधळ झाल्यानंतर या वसुलीधारकांनी आपल्या इतर साथीदारांना बोलावून घेतले. यावेळी जमा झालेल्या टोळक्याने पत्रकार किरण ताजणे यांना लाथाबुक्क्या, छत्री आणि दगडांनी मारहाण केली. यात ताजणे गंभीर जखमी झाल्याने त्यांना इतर पत्रकारांनी तात्काळ रुग्णालयात दाखल केले.

## भुजबळ यांनी घेतली ताजणे यांची भेट

मंत्री छगन भुजबळ यांनी पत्रकार किरण ताजणे यांची अपोलो रुग्णालयात जाऊन भेट घेत तब्येतीची विचारपूस केली. यावेळी माध्यमांशी बोलतांना ते म्हणाले की, ही घटना अतिशय निंदनीय असून, त्याचा मी निषेध करतो. पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील यांना फोन करून दोषींवर कडक कारवाई करण्याच्या सूचना आपण केल्या आहेत.

## मंत्री विखेंकडूनही घटनेचा निषेध

या घटनेबाबत मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी ट्विट करत म्हटले की, माध्यम प्रतिनिधींवर स्थानिक तरुणाकडून करण्यात आलेल्या मारहाणीचा मी तीव्र शब्दांत निषेध करतो. प्रसारमाध्यमे लोकांच्या समस्या, वास्तव आणि सत्य समाजासमोर मांडण्यासाठी अहोरात्र परिश्रम घेत असतात. अशा परिस्थितीत पत्रकारांवर हल्ला करणे, हे अत्यंत निंदनीय असून कोणत्याही परिस्थितीत सहन केले जाणार नाही. या घटनेत सहभागी असलेल्या आरोपींवर तातडीने आणि कडक कारवाई करावी.

दरम्यान, या मारहाण प्रकरणी त्र्यंबक पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, तिघांना अटक करण्यात आली आहे. मारहाण करणाऱ्यांमध्ये एकावर ३०७ चा गुन्हा दाखल असल्याचे समोर आले आहे. सध्या ताजणे यांच्यावर नाशिकच्या अपोलो रुग्णालयात उपचार सुरु असून त्यांची मंत्री गिरीश महाजन सायंकाळी भेट घेणार आहेत.

त्र्यंबकेश्वर मंदिर परिसरातील स्वामी समर्थ केंद्राजवळील कमानी परिसरात पत्रकारांना काही गुंडाकडून पार्किंगच्या वुसलीवरुन झालेल्या बाचाबाचीतून मारहाण करण्यात आल्याची घटना घडली. येथे गाड्यांच्या प्रवेशासाठी पावती घेणाऱ्या काही व्यक्तींनी, पत्रकारांवर अचानक हल्ला केला. पत्रकार वार्तांकनासाठी त्र्यंबकेश्वरला गेले असता संबंधित गुंडांकडून त्यांना बेदम मारहाण करण्यात आली आहे. त्यामध्ये, तीन ते चार पत्रकार जखमी झाले असून त्यांना तात्काळ त्र्यंबकेश्वरच्या सरकारी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. त्यातील एकाची प्रकृती गंभीर असून त्यांच्यावर आयसीयुमध्ये उपचार सुरू आहेत.

मुख्यमंत्री, गृहमंत्री तथा उपमुख्यमंत्र्यांनीही या घटनेची गंभीर दखल घेतल्यानंतर आता पत्रकारांना मारहाण प्रकरणी त्र्यंबकेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पत्रकार संरक्षण कायदा, जीवे मारण्याचा प्रयत्न, तसेच दंगल माजवल्याप्रकरणी आरोपींवर गुन्हा दाखल झाला असून तिघांना अटकही करण्यात आली आहे. प्रशांत राजू सोनवणे, शिवराज धनराज आहेर आणि ऋषिकेश योगेश गांगुर्डे यांना अटक करण्यात आली असून त्यांच्या साथीदारांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी दाखल फियार्दीत, जीवे मारण्याच्या हेतूने लाथा बुक्क्या, दगड, छत्रीच्या दांड्याने मारहाण केल्याचा आरोप ठेवण्यात आला आहे.

नाशिकमध्ये पत्रकारांवर गुंडांकडून झालेल्या हल्ल्याचा बच्चू कडू यांनीही निषेध केला आहे. पत्रकारांवर सातत्याने हल्ले होत असल्याने बच्चू कडू आता पत्रकारांसाठी मैदानात उतरणार आहेत. लोकशाही बळकट करण्यासाठी पत्रकार काम करत असतात, त्यामुळे आम्ही त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा आहोत. पत्रकारांनी धास्ती घेऊ नये, पत्रकार म्हणून लोकशाही जिवंत ठेवण्याचं काम पत्रकार करतात असे म्हणत बच्चू कडूंनी पत्रकारांच्या कायार्ला सलाम असल्याचंही म्हटलं.

## कवडीमोल भाव ! कांदा सडू लागला संतप्त शेतक-यांचा रास्ता रोको



**■नाशिक। प्रतिनिधी,**

गेले काही दिवस नाशिक जिल्ह्यातील कांदा उत्पादन पट्ट्यात शेतकऱ्यांचे सतत आंदोलन सुरू आहे. धुळे, चांदवड , मालेगाव, लासलगाव येथे आंदोलने झाल्यानंतर आज येवल्याच्या एरंडगावचे कांदा उत्पादक शेतकरी आपल्या मागण्यासाठी रस्त्यावर उतरले . मालेगाव सूरत रस्त्यावरही शेतकऱ्यांनी कांदा फेकून आंदोलन केले.

प्रहार संघटनेच्या नेतृत्त्वाखाली आंदोलन करीत या शेतकऱ्यांनी सकाळी नाशिक ने छत्रपती संभाजीनगर जाणाऱ्या महामार्गावर रास्ता रोको केला. या आंदोलनावेळी शेतकरी म्हणाले की केंद्राच्या हस्तक्षेपामुळे कांद्याचा भाव पडला आहे. आता कांदा प्रति क्विंटल केवळ ७०० ते ८०० रुपये दराने खरेदी केला जात आहे. यात आमचा वाहतूक खर्चही निघत नाही. काहींनी चांगला भाव नंतर मिळेल या आशेने कांदा साठवला होता तोही सडू लागला आहे. कांद्याला ३ हजार रुपये क्विंटल भाव मिळावा अशी शेतकऱ्यांची मागणी आहे.

## कर्जतच्या जंगलात सापडलेल्या नौदल अधिकाऱ्याच्या मृत्यूचे गूढ उकलले; मोबाईलचे लोकेशन...

**■कर्जत। प्रतिनिधी,**

काही दिवसांपूर्वी कर्जतच्या जंगलात एका नौदल अधिकाऱ्याचा मृतदेह सापडला होता. सुरजसिंह अमरपालसिंह चौहान असं या नौदल अधिकाऱ्याचे नाव होते. 7 सप्टेंबरपासून ते बेपत्ता होते. 15 सप्टेंबर रोजी सूरज सिंग यांचा मृतदेह सापडला होता. अखेर त्यांच्या मृत्यूचे गूढ समोर आले आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दक्षिण मुंबईतील कुलाबा येथील डॉकयार्ड नौदलात कार्यरत असलेल्या सूरजसिंह चौहान हा जवान कार्यरत होता. काही दिवसांपूर्वी रहस्यमयरित्या बेपत्ता झाला होता. 7 सप्टेंबरपासून तो बेपत्ता होता. त्याचा मोबाइलही बंद लागत होता. त्यामुळं नौदल, पोलीस व नातेवाईक यांच्यात चिंता पसरली होती. 29 मे रोजी 2025 रोजी त्याची नेमणूक मुंबईच्या नौदलाच्या ऋ्ळ्ळ्ळ विभागात झाली होती. सूरजसिंह यांच्या मोबाईलचे शेवटचे लोकेशन कर्जत तालुक्यातील भिवपुरी रोड स्टेशन परिसरात मिळाल्याने



नेरळ पोलीस आणि नौदलाचे अधिकाऱ्यांनी मोहिम राबवली होती. 15 सप्टेंबर रोजी त्याचा मृतदेह माथेरान डोंगरातील पाली भूतिवली धरण ते गार्बेट या मार्गावरील सातोबा मंदिरामागील टेकडीवरील 50 फूट खोल दरीत मृतदेह दिसून आला. नौदल अधिकारी यांचा मृतदेह स्थानिक आदिवासी गुराखी यांना दिसून आल्यानंतर त्यांनी नेरळ पोलिसांना कळवलं. नौदल अधिकारी चौहान हे 7 सप्टेंबर रोजी लोणावळा येथील डोम धरण आणि नंतर कर्जत तालुक्यातील पाली भूतिवली धरण परिसरात पुढे गार्बेट येथे जात असल्याचं त्यांच्या मोबाईल लोकेशनवर स्पष्ट झालं. त्यांचं शेवटचं लोकेशन पाली भूतिवली धरणाच्या बाजूला माथेरान डोंगराच्या पायथ्याशी आढळून आलं होतं. त्यांनतर सकाळी सव्वाआठ वाजताच्या नंतर त्याबाबत कोणतीही माहिती मिळाली नाही. दरम्यान, पोलिसांनी या प्रकरणात अपघाती मृत्यू अहवाल नोंदवला आहे. मृत्यूचे नेमके कारण शोधण्यासाठी मृतदेह पोस्टमार्टेमसाठी मुंबईच्या जेजे रुग्णालयात पाठवला आहे. ते घसरून पडले असावेत किंवा साप चावल्याने मृत्यू झाला असावा. नौदल अधिकारी यांचा मोबाईलचची रेंज गेल्याने त्यांना लोकेशन न सापडल्याने रस्ता भरकटला असल्याने त्यांचा मृत्यू झाल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. सूरजसिंह अमरपालसिंह चौहान हे ३३ वर्षीय नौदल अधिकारी होते, जे दक्षिण मुंबईतील कुलाबा येथील डॉकयार्डमधील FTTT विभागात मास्टर चीफ, क्लास क्क म्हणून कार्यरत होते. ते ७ सप्टेंबर २०२५ पासून बेपत्ता होते आणि १५ सप्टेंबर २०२५ रोजी कर्जत तालुक्यातील माथेरान डोंगराजवळील जंगलात त्यांचा मृतदेह सापडला. पोलिसांच्या मते, हा अपघाती मृत्यू असून, घसरून पडणे किंवा साप चावणे अशा कारणांमुळे मृत्यू झाल्याची शक्यता आहे. सूरजसिंह चौहान ७ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी सीएसटी स्टेशनहून भिवपुरी रोडला ट्रेनने गेले आणि नंतर भिवपुरी-गार्बेट ट्रेकिंग ट्रेलवर गेले. त्यांचा शेवटचा मोबाइल लोकेशन डोम धरण आणि पाली भूतिवली धरण परिसरात मिळाले. त्यानंतर फोन बंद झाला. १५ सप्टेंबर रोजी स्थानिक आदिवासी गुराखींनी सातोबा मंदिरामागील ५० फूट खोल दरीत मृतदेह पाहिला आणि नेरळ पोलिसांना कळवले. नौदल आणि नेरळ पोलिसांच्या संयुक्त मोहिमेत शोध लागला. सूरजसिंह चौहान यांची २९ मे २०२५ रोजी मुंबईच्या नौदलाच्या FTTT विभागात नेमणूक झाली होती.

## एसटी कर्मचारी ऐन दिवाळीत आंदोलनाच्या तयारीत

**■मुंबई । प्रतिनिधी,**

एसटी कर्मचारी ऐन दिवाळीत पुन्हा एकदा आंदोलन करण्याच्या तयारीत आहेत. एसटी कर्मचाऱ्यांच्या या आंदोलनामुळे महाराष्ट्रातील सर्वसामान्य जनतेची चिंता वाढणार आहे. एसटी कर्मचाऱ्यांनी याआधीदेखील ऐन दिवाळीत जवळपास महिनाभर आंदोलन केले होते. त्यांच्या या संपामुळे ग्रामीण महाराष्ट्राचा तालुका आणि जिल्ह्यांशी थेट संपर्क तुटला होता. ग्रामीण भागातील नागरिकांचा आजही प्रवासाचे महत्त्वाचे साधन हे एसटी बस आहे. तीन वर्षांपूर्वी जेव्हा एसटी कर्मचाऱ्यांनी संप पुकारला होता तेव्हा अनेक गाव-खेड्यांमधील नागरीक हवालदिल झाले होते. जिल्ह्यातून गावाला जाणे हे खूप खर्चिक झाले होते. कारण खासगी वाहनांकडून अव्वाच्या सव्वा भाडे आकारण्यात येत होते. एसटी कर्मचाऱ्यांनी पुन्हा संप पुकारला तर त्याचा फटका ग्रामीण महाराष्ट्राला तसेच शहरातून दिवाळीसाठी गावाकडे जाणाऱ्या नागरिकांनादेखील होण्याची शक्यता आहे. त्यामुळे सरकारला



एसटी कर्मचाऱ्यांच्या मागण्यांबाबत गांभीयार्ने लक्ष देणे गरजेचे असणार आहे. एसटी कर्मचाऱ्यांचा इशारा काय? ऐन दिवाळीच्या मुहुर्तावर एसटी कर्मचाऱ्यांनी आंदोलनाचा इशारा दिला आहे. एसटी कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित आर्थिक मागण्यांकडे शासनाने दुर्लक्ष केल्याचा आरोप भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांच्या संघटनेने केला आहे. सेवा शक्ती संघर्ष एसटी कर्मचारी संघटनेकडून आत्मक्लेश आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे. मुंबईतील मध्यवर्ती कार्यालयात हे आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे. एसटी कर्मचाऱ्यांनी आपल्या विविध मागण्या शासनाकडे केल्या आहेत. पण शासनाकडून हवा तसा प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे गोपीचंद पडळकर यांच्या नेतृत्वातील सेवा शक्ती संघर्ष एसटी कर्मचारी संघटनेने आंदोलनाचा इशारा दिला आहे.

## तारापूर पोलिस ठाण्यातील दाखल खुनाच्या गुन्ह्याची पोलिसांनी केली उकल

**■पालघर । प्रतिनिधी,**

तारापुर पोलीस ठाणे येथे दाखल खुनाचा गुन्हा उघड करण्यात पालघर पोलीसांना यश.मिळालेल्या माहितीनुसार दि.०३/०९/२०२५ रोजी पहाटे ००.०६ ते दि. ०३/०९/२०२५ रोजी १८.५९ वाजताचे दरम्यान बालाजी कॉम्पलेक्स, मधील बालाजी बिल्डींग नं. ०२, रुम नं. ००२, परनाळी ता. जि. पालघर येथे मयत हरिश सुखाडीया, अंदाजे वय ३० वर्षे यास आरोपी सुरेंदर चंद्र सिंह व रेखा दुगार्दास वैष्णव यांनी कोणत्यातरी अज्ञात कारणावरुन जिवे ठार मारण्याच्या उद्देशाने कोणत्यातरी धारदार हत्याराने वार करुन जिवे ठार मारले. त्याबाबत तारापुर पोलीस ठाणे येथे दि. ०४/०९/२०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.

सदर गुन्हयाचे गांर्भीय लक्षात घेता श्री. यतिश देशमुख, पोलीस अधीक्षक, पालघर यांनी स्थानिक गुन्हे शाखा पालघर व तारापुर पोलीस ठाणे यांचेकडील पोलीस अधिकारी व अमंलदार यांचे वेगवेगळी पथके तयार करुन त्यांना सदर गुन्हा उघडकीस आणणे बाबत मार्गदर्शन केले.

स्थानिक गुन्हे शाखा पालघर कडील पथकाने गुन्हयाचे घटनास्थळी भेट देवून गुन्हयाची माहिती घेवुन यातील आरोपीचा राजस्थान, मध्यप्रदेश व गुजरात राज्यात अथक परिश्रम घेवुन शोध घेवुन, बातमीदारांचे मदतीने माहिती मिळवुन व तांत्रीक माहितीच्या आधारे आरोपी १) सुरेद्रं चंद सिंग, वय ३४ वर्षे, २) रेखा दुगार्दास वैष्णव, वय २५ वर्षे दोन्ही रा. परनाळी ता.जि. पालघर मुळ रा. राजस्थान यांना वापी, गुजरात राज्य येथुन ताब्यात घेवुन त्यांचेकडे सखोल चौकशी केली असता प्रेमसबंधातुन सदरचा गुन्हा केल्याचे आरोपीनी कबुली दिलेली आहे.

नमूद गुन्ह्यात आरोपींना अटक केले असून सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि/निवास कणसे, तारापुर पोलीस ठाणे हे करीत आहेत.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक, पालघर श्री. यतिश देशीमुख, अपर पोलीस अधीक्षक, पालघर श्री. विनायक नरळे, उप विभागीय पोलीस अधिकारी, बोईसर विभाग श्री. विकास नाईक यांच्या मार्गदर्शनानुसार पोलीस निरीक्षक श्री. प्रदिप पाटील, पोउपनि/रोहीत खोत, पोउपनि/गोरखनाथ राठोड, श्रे. पोउपनि/राजेश वाघ, श्रे. पोउपनि /सुनिल नलावडे, पोहवा/दिपक राऊत, पोहवा/संदिप सुर्यवंशी, पोहवा/विजय ठाकुर, पोहवा/संजय थांगडा, पोहवा/नरेंद्र पाटील, पोना/कल्याण केंगार, पोअमं/प्रशांत निकम, पोअमं/वैभव जामदार सर्व नेमणुक स्थानिक गुन्हे शाखा, पालघर तसेच सपोनि/निवास कणसे, पोअमं/जितेंद्र वसावे, म. पोअमं/उज्वला पोतदार नेमणुक तारापुर पोलीस ठाणे यांनी पार पाडलेली आहे.

## अनैतिक मानवीव्यापार करणाऱ्या गुन्हेगारांवर कारवाई करून पोलिसांनी तीन पिडीत महिलांची केली सुटका

**■पालघर । प्रतिनिधी,**

अनैतिक मानवीव्यापार करणाऱ्या गुन्हेगारांवर कारवाई करून पोलिसांनी तीन पिडीत महिलांची सुटका पालघर पोलिसांकडून करण्यात आली आहे. स्थानिक गुन्हे शाखा, पालघर व अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष, पालघर यांची कारवाई.अधिक माहितीनुसार पोलीस अधीक्षक पालघर श्री. यतिश देशमुख यांनी पालघर जिल्हयातील अवैद्य धंदयाचे समूळ उच्चाटन करण्याबाबत सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी व स्थानिक गुन्हे शाखा, पालघर यांना सक्त सुचना दिलेल्या आहेत.त्यानुसार दि.१९/०९/२०२५ रोजी पोलीस निरीक्षक श्री. प्रदिप पाटील, स्थानिक गुन्हे शाखा, पालघर यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे, शाखा, पालघर यांचे पथकाने बोईसर येथे सहारा हॉटेल एन्क्लेव्ह बिल्डींग, नवापुर नाका बोईसर ता. जि. पालघर येथे वेश्याव्यवसाय चालत असल्याची गुप्त माहिती मिळवली. नमूद माहितीच्या आधारे सापळा रचुन दि. १९/०९/२०२५ रोजी सहारा हॉटेल एन्क्लेव्ह बिल्डींग, नवापुर नाका बोईसर ता. जि. पालघर येथे डमी गिन्हाईक यांना आरोपी विनय जयकिसन धुपर, वय ३९ वर्षे, व्यवसाय-हॉटेल मॅनेजर रा. परनाळी ता.जि. पालघर मुळ रा. पटीयाला पंजाब राज्य यांनी ०३ पिडीत महीलांना वेश्या व्यावसायाकरीता मिळवुन त्यांना वेश्या व्यावसाय करीता प्रवृत्त करून त्या पिडीत महिला पुरुष गि-हाईकास वेश्यागनमना करीता पुरवून नमुद महिलांच्या वेश्यागमनाचा मोबदला स्वतःच्या उपजिवीकेसाठी स्विकारुन पिडीत महिलांना पुरुष ग्राहकासांठी वेश्यागमनाकरीता उद्युक्त करून वेश्या व्यवसायाच्या प्राप्त कमाईच्या मिळकतीवर अवलंबुन राहुन वेश्याव्यवसायास प्रेरणा दिली म्हणून आरोपीविरूध्द बोईसर पोलीस ठाणे येथे दि. २०/०९/२०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नमूद गुन्ह्यात आरोपीस अटक करण्यात आली आहे. तसेच तिनही पिडीत महिलांना चिल्ड्रन होम फॉर गर्ल्स रेस्क्यू फाऊंडेशन बोईसर येथे दाखल करण्याची व आरोपीस मा. न्यायालयात हजर करण्याची कारवाई करण्यात येत आहे. गुन्हयाचा पुढील तपास सपोनि/अनिल व्हटकर, नेमणूक स्थानिक गुन्हे शाखा, पालघर हे करीत आहेत.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक, पालघर श्री. यतिश देशमुख, अपर पोलीस अधीक्षक, पालघर श्री. विनायक नरळे यांच्या मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे पोलीस निरीक्षक श्री. प्रदिप पाटील, सहा. पो. निरीक्षक श्री. अनिल व्हटकर, पोउपनि/गोरखनाथ राठोड, पोउपनि/कृष्णा ठाकरे, पोहवा/दिपक राऊत, पोहवा/संदिप सुर्यवंशी, पोहवा/कपिल नेमाडे, पोहवा/भगवान आव्हाड, पोहवा/प्रकाश महाले, पोना/राजेंद्र हरणे, पोना/मनोज राऊत, पोअमं/स्वप्नील जाधव, म. पोहवा/संजीवनी धांगडा, म. पोना/सीमा भोये सर्व नेमणूक स्थानिक गुन्हे, शाखा, पालघर व अनैतीक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष, पालघर यांनी पार पाडलेली आहे.



संपादकीय...

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# अशोभनीय टाळाटाळ



एखाद्या संवैधानिक संस्थेला पुरेसे अधिकार दिले, ते अधिकार वापरण्याचं स्वातंत्र्य दिलं, तरीही त्या संस्थेने मिळालेलं स्वातंत्र्य ते अधिकार न वापरण्यासाठीच वापरायचं ठरवलं तर त्याला काय म्हणणार? अशावेळी संबंधित संस्थेला कार्यतत्पर करण्यासाठी जे जास्तीत जास्त करता येतं, तेच सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी केलं. विषय आहे, महाराष्ट्रात दीर्घ काळापासून रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा. या निवडणुका व्हाव्यात यासाठी अनेकजण अनेकवेळा न्यायालयात गेले; तसे निवडणूक प्रक्रियेतील मुद्द्यांचा पूर्ण खुलासा झाल्याशिवाय निवडणुका घेणं उचित नाही, हे सांगण्यासाठीही अनेकजण न्यायालयात गेले. जे प्रक्रियेतील स्पष्टीकरणासाठी गेले, त्यांचे मुद्दे अधिक गुंतागुंतीचे असल्याने त्या संबंधातील न्यायालयीन प्रक्रिया लांबत गेली, निकाल आले नाहीत; परिणामी निवडणुकीची प्रक्रिया सुरू होऊ शकली नाही. ही वस्तुस्थिती न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर न्यायालयाने २०१७ मध्ये ज्या सूत्राने निवडणुका झाल्या, त्याच पद्धतीने; पण न्यायालयासमोरील प्रलंबित प्रकरणांच्या निकालांच्या अधीन राहून निवडणुका घ्या , असा आदेश मे महिन्यात दिला. त्या आदेशातच ऑक्टोबर अखेरपर्यंत निवडणुका घेण्याचे निर्देशही दिले होते. पण, प्रत्यक्षात राज्य निवडणूक आयोगाने अपेक्षित वेगाने प्रक्रिया न राबवल्याने आता न्यायालयाला जानेवारी २०२६ पर्यंतची मुदत द्यावी लागली आहे. गेल्या वेळी मुदत देऊनही निवडणूक आयोग अपेक्षित गतीने न हलल्याने न्यायालयाने यावेळी निवडणूक प्रक्रियेतील महत्त्वाच्या टप्प्यांचं वेळापत्रकच आखून दिलं आहे. काही मुद्द्यांबाबत स्पष्टीकरणाची गरज भासलीच, तर त्यासाठी येत्या दीड महिन्यांत येण्याची मुदतही दिली आहे. न्यायालयाने एवढी आग्रहाची भूमिका घेतल्याने जानेवारीअखेरपर्यंत निवडणुका होतील, अशी आशा करायला आता हरकत नाही. केवळ आशाच करावी लागते आहे, कारण निवडणूक आयोगाचा मंगळवारीही न्यायालयात फारसा उत्साह नव्हता. सणासुदीपासून शालेय-महाविद्यालयीन परीक्षांपर्यंत असंख्य कारणं पुढे करत आयोग जानेवारीअखेरची मुदत स्वीकारायलाही नाखूश होता. आयोगाची भूमिका जर अशीच असेल, म्हणजे सरकारलाही या निवडणुका घेण्याविषयी अगत्य नसेल, तर त्या आणखी पुढे ढकलण्यासाठी असंख्य सबळ कारण उपलब्ध आहेत. त्यातलं कुठलंही कारण पुढे करून, कदाचित न्यायालयीन पेचाचंच उदाहरण देऊनही निवडणुका आणखी पुढे नेल्या जाऊ शकतात. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याचे अधिकार १९९० पर्यंत पूर्णपणे राज्य सरकारच्या हाती होते. ज्यांच्या हाती सरकार, ते त्यांच्या राजकीय लाभहानीचं गणित मांडत या निवडणुका पुढेमागे करत असत. लोकशाहीतल्या सर्वात खालच्या स्तरातल्या, जनतेशी सर्वाधिक निगडित असलेल्या संस्थांचे कारभार त्यामुळे बेभरवशी राहात असत. लोकशाहीतील विकेंद्रीकरणाच्या मूळ गाभ्याला छेद जात असे. यात सुधारणा करण्यासाठी तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी यांनी ६४ वी घटनादुरुस्ती आणली. ती यशस्वी न झाल्याने पंतप्रधान नरसिंहराव यांनी ७३ वी आणि ७४ वी घटनादुरुस्ती केली. या घटनादुरुस्तीने स्थानिक स्वराज्य संस्थांना संविधानिक दर्जा दिलाच; शिवाय या संस्थांच्या निवडणुका घेण्यासाठी प्रत्येक राज्यात 'राज्य निवडणूक आयोगां'ची तरतूद करण्यात आली. या आयोगाला स्वायत्तता देण्यात आली. आयोगाला स्वायत्तता दिली, तरी राज्य निवडणूक आयुक्तांच्या नियुक्तीचे अधिकार राज्य सरकारकडेच दिले गेले. त्यामुळे, राज्या-राज्यातील हे आयोग राज्यातल्या सत्ताधाऱ्यांच्या कलानेच चालू लागले. सुरुवातीची १५-२० वर्षं आयुक्तांनी दाखवण्यापुरता का होईना, स्वतंत्र बाणा दाखवला. गेल्या काही वर्षांत मात्र सर्वत्रच जी घसरण सुरू आहे, ती इथेही झाल्याने राज्य निवडणूक आयोग हे राज्य सरकारच्या तालावरच चालणार की काय, अशी शंका घेण्यासारखी परिस्थिती निर्माण झाली आहे. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची यांनी मंगळवारी हे प्रकरण ज्याप्रकारे हाताळलं, आयोगाला धारेवर धरत जे निर्देश दिले, ते या शंकेला आधार देणारेच होते. पाच वर्षांपेक्षा अधिक काळ स्थानिक स्वराज्य संस्थांचा कारभार पूर्णपणे अधिकाऱ्यांच्या हाती असून विविध विकासकामे किंवा मोठे प्रकल्प मंजूर करताना जी प्रक्रिया पार पाडली जाते आहे, ती हास्यास्पद आहे. लोकप्रतिनिधींच्या किंवा अतिस्थानिक हितसंबंधांमुळे विकासकामांत अडथळा येतो, गैरव्यवहारांची शक्यता वाढते अशी तक्रार करणाऱ्यांनी गेल्या पाच वर्षातला जनतेचा अनुभव काय आहे, गेल्या पाच वर्षांत गावागावात किती सुधारणा झाल्या, हे एकदा जनतेत जाऊनच विचारलं पाहिजे. या निवडणुकांची टाळाटाळ सुरू आहे, ती केवळ राजकीय इच्छाशक्तीच्या अभावी. स्थानिक लोकप्रतिनिधी नसतील, तर आमदार आणि सरकारमधील संबंधितांना अधिकाऱ्यांमार्फत कारभार करता येतो. पुन्हा निवडणुकीत स्थानिक परिस्थितीनुसार वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळे निकाल लागण्याची शक्यता असते, नव्या स्थानिक आघाड्या जन्म घेऊ शकतात. हे सगळं टाळण्याचा सर्वात सोपा उपाय निवडणुका टाळण्याचाच असतो. न्यायालयाच्या या निकालाने त्याला आता कसा प्रतिबंध होतो, ते पाहावं लागेल. भारतीय लोकशाही राज्यव्यवस्थेच्या त्रिस्तरीय रचनेत स्थानिक स्वराज्य संस्थांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. या संस्था म्हणजे एकाथार्ने लोकशाही व्यवस्थेचा नांगरच आहेत. हा नांगर भक्कम आणि स्थिर राहिला, तरच वरचं जहाज स्थिर राहतं, हे लक्षात घेऊन निवडणुका वेळेत होणंच सगळ्यांच्या हिताचं आहे.

# 'गो बॅक'ची नारेबाजी अदानी अंबुजा सिमेंटला विरोध




ठाणे जिल्ह्यातील कल्याण तालुक्यात असलेले आंबिवली येथील अदानी समूहाच्या प्रस्तावित अंबुजा सिमेंट कारखान्यासाठी काल जनसुनावणी झाली. यावेळी आजूबाजूच्या 10 गावांतील रहिवाशांनी या प्रकल्पाला कडाडून विरोध केला. ह्यअदानी गो बॅकह्णचा नारा देण्यात आला. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाची ही जनसुनावणी म्हणजे निव्वळ फार्स असून, अदानीच्या सांगण्यानुसार याचे आयोजन करण्यात आल्याचा आरोप सहभागी ग्रामस्थांनी केला. गणेशोत्सवात लोक व्यग्र असल्याचे बघून मोजक्या वर्तमानपत्रांमध्ये जनसुनावणीची जाहिरात देण्यात आली. स्थानिक नागरिकांना कोणताही अभ्यास, तयारी करता येऊ नये म्हणूनच ही घाई करण्यात आल्याचेही नागरिक म्हणाले.

महिनाभरात पुन्हा सुनावणी घेण्याची मागणी त्यांनी केली. अदानींचा हा सिमेंट कारखाना म्हणजे हिरवळ उगवण्याची योजना असेल, तर अदानींच्या दारातच हा प्रकल्प उभारा, असा संताप व्यक्त करण्यात आला. जनसुनावणीला आंबिवली, मोहने, अटाळीसह आजूबाजूच्या गावांतील रहिवाशांनी सहभाग घेतला. रक्ताचे पाट वाहतील, पण सिमेंट कारखाना होऊ देणार नाही, असा इशारा देण्यात आला. अदानी समूहाने विकत घेतलेल्या आंबिवली येथील एनआरसी कंपनीच्या जवळपास 450 एकर जागेत हा प्रकल्प उभारला जाणार आहे. त्याआधीच या प्रकल्पाला मोठ्या जनविरोधाला सामोरे जावे लागत आहे. ह्यचले जाव अंबुजा सिमेंट चले जाव, गो बॅक अदानी, नहीं चलेगी नहीं चलेगी, दादागिरी नहीं चलेगी, अंबुजा सिमेंट मुदार्बादह्ण अशा घोषणाबाजीत सकाळी जनसुनावणीला सुरुवात झाली. आंबिवली येथील एनआरसी कंपनीच्या परिसरातील या जनसुनावणीच्या सुरुवातीलाच पोलीस आणि खासगी बाऊन्सर यांचा बंदोबस्त अदानी समूहातर्फे केला होता. या नियोजित सिमेंट कारखान्यामुळे स्थानिक लोकांना आरोग्याचा कोणताही धोका नसल्याचा अहवाल सादर केला आहे. हाच धागा पकडत उबाठा भिवंडी लोकसभा मतदारसंघातील पदाधिकारी आशा रसाळ म्हणाल्या की, कंपनीचे सादरीकरण बघून येथे सिमेंट कारखाना होणार नसून केवळ हिरवी झाडे उगवणार आहेत असे वाटले. अदानी यांच्या घरीच असा हिरवा कारखाना उभा करा. कारखाना उभारेपर्यंत असेच गोडगोड बोलत राहतील. आम्हाला असा कारखाना नको. सरकार काहीही लादेल, जनता हे खपवून घेणार नाही. जनसुनावणीचा हा फार्स आहे. केवळ आठ दिवस आधी आम्हाला जनसुनावणीची माहिती मिळाली. येथे राहणाऱ्या 50 लाख लोकांच्या जीवाचा प्रश्न आहे. 1947 साली एनआरसी कंपनी स्थापन झाली तेव्हा येथे लोकवस्ती नव्हती. आज दाट लोकवस्ती आहे, ही बाब विचारात घ्यायला हवी. जोरजबरदस्ती केली तर जशास तसे उत्तर देऊ.

सिमेंट कारखान्यामुळे लाखो लोकांच्या जीवाला धोका होणार आहे. पण कंपनीकडून केवळ 20 पानांचा अहवाल सादर करून लाखोंच्या जीवाशी खेळले जात असल्याचा आरोप अटाळी येथील बाळकृष्ण पाटील यांनी केला. ही सिमेंट कंपनी नाही तर कॅन्सर निर्मिती कंपनी आहे, असेही ते म्हणाले. रिपब्लिकन नेते श्याम गायकवाड म्हणाले, प्रदूषण नियंत्रण मंडळ नाही, तर हे प्रदूषक मंडळ आहे. हा प्रकल्प अदानीचा आहे. अदानीसाठी सरकारने कायकाय केले हे तुम्हाला नीट माहीत आहे. शुद्धीकरण प्रकल्पामधून (एसटीपी) होणारे प्रदूषण हे कंपनीबाहेरच जाणार आहे. मग हे कसे म्हणतात कंपनीतच त्यावर प्रक्रिया होईल? कारखान्यात भट्टी वापरणार का, हेवी मेटल निघणार आहेत का, कोळशाचा वापर केला जाणार आहे की नाही? असे प्रश्न त्यांनी विचारले. अनेक तांत्रिक मुद्यांवर त्यांनी अदानींच्या अधिकाऱ्यांना भंडावून सोडले. स्क्रिप्टनुसार ही जनसुनावणी होत आहे. त्यामुळे या जनसुनावणीला काहीच अर्थ नाही, असा आरोप करत ते निघून गेले. तसेच अदानी हटाव, आमचा परिसर बचाव , असा नाराही दिला.

काँग्रेस शहराध्यक्षांनी जनसुनावणीतील प्रश्नोत्तरे लिखित स्वरुपात प्रसिद्ध करण्याची मागणी केली. प्रकल्प रद्द न केल्यास राहुल गांधींपर्यंत हा मुद्दा नेणार असल्याचा इशारा दिला. काही नागरिकांनी कारखान्यासाठी दररोज सहा लाख लीटर पाणी लागणार आहे, ते कुठून आणणार आहात. परिसरात आधीच मोठ्या पाणीटंचाईला सामोरे जात असताना तुम्ही पाणीही बाहेरून आणणार का, असा सवाल केला. त्यावर नदीतील पाणी वापरणार नसल्याचे कंपनीतर्फे सांगण्यात आले. भूजल आणि जमिनीवरील पाणी वापरणार असल्याचे सांगितले. यावर नागरिकांनी तुम्ही आमच्या जमिनीतील पाणी वापरू शकत नाही, असे प्रत्युत्तर दिले.माजी नगरसेवक के. सी. कटारिया म्हणाले, अदानी समूहाने ढोबळ माहितीच्या आधारे प्रदूषण नियंत्रण मंडळाला अहवाल सादर केला आहे. हा अहवाल दिशाभूल करणारा असल्यामुळे मंडळाने स्वतःहून सर्व्हेक्षण करावे. त्यामध्ये स्थानिक नागरिक, पर्यावरण कार्यकर्ते यांनाही सहभागी करून घ्यावे. सिमेंट कंपनीऐवजी आयटी पार्क उभारा, स्थानिक तरुणांना रोजगार मिळेल, त्यातून देशाला हातभार लागेल. पुण्यात साखर कारखाना होणार होता, तो रद्द करून शरद पवारांनी तिथे आयटी पार्क सुरू केला, असेही कटारिया यांनी सांगितले. एनआरसी कंपनीकडे तब्बल दोन हजार कोटी रुपयांची थकबाकी असल्याचा मुद्दा माजी कामगारांनी वेळोवेळी मांडला. अदानी समूह ही थकबाकी देणार का, या प्रश्नावर कायद्याने यंत्रणांकडून जे दिशानिर्देश येतील, तसा निर्णय घेतला जाईल, असे आश्वासन कंपनीकडून देण्यात आले. एनआरसी कंपनीमध्ये तब्बल साडेचार हजार लोकांना रोजगार होता. पण अदानींच्या कंपनीत दोन-चारशे लोकांनाच रोजगाराची संधी उत्पन्न होत असल्याची बाबही यावेळी स्थानिक नागरिकांनी अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिली. माजी नगरसेवक दया शेट्टी यांनी प्रदूषण होणार आहे म्हणून, तर ही जनसुनावणी घेतली आहे, असे म्हणत प्रदुषणाचा मुद्दा अधोरेखित केला.संकल्पना कऱ्हाडे यांनी प्रदूषण नियंत्रण मंडळ विश्वासार्ह आहे का, असा थेट सवाल केला. तुमच्यावर कसा विश्वास ठेवायचा? उल्हास, काळू नदी प्रदूषित होत आहे. मग तुम्ही कशाचे नियंत्रण करणार आहात? हा प्रकल्प पंचक्रोशीतील लाखो लोकांचा जीव घ्यायला निघालेला आहे, असे त्या म्हणाल्या. जगभरात मातीची घरे उभारण्याचा ट्रेंड असताना तुम्हाला ही अवदसा का सुचली, या प्रश्नावर लोकांनी टाळ्या वाजवून दाद दिली. अदानींच्या विरोधात जोरदार घोषणा दिल्या. एकच मुद्दा वारंवार विचारला जातोय असा आक्षेप अधिकाऱ्यांनी घेतला. त्यावर लोक म्हणाले, हा प्रश्न लोकांच्या किती जिव्हाळ्याचा, जीवनमरणाचा आहे हे यातून स्पष्ट होते. त्यामुळे सगळे प्रश्न ऐका.मोहने येथील ग्रामस्थ मंडळाचे प्रमुख सुभाष पाटील यांनी जनसुनावणीमध्ये कंपनीच्या प्रतिनिधींना स्थानिक लोकांनी नाही, तर प्रदूषण नियंत्रण मंडळानेच प्रश्न विचारायला हवेत, असा मुद्दा मांडला. एनआरसी कंपनीकडे माजी कामगारांची तब्बल दोन हजार कोटी रुपयांची थकबाकी आहे, जोपर्यंत थकबाकी मिळणार नाही, तोपर्यंत कारखान्याचा विषय पुढे जाऊ देणार नसल्याचा इशारा त्यांनी दिला. आणखी एका नागरिकाने आमच्या पूर्वजांनी मुलांच्या भविष्याचा विचार करून एनआरसी कंपनीला जमीन दिली होती, अदानी समूह विश्वासार्ह नाही, असे सांगत अदानी अंबुजा सिमेंट कारखान्याला विरोध केला. प्रदूषण मंडळाने उत्तर द्यायला पाहिजे, पण अदानीचे लोक उत्तर देत आहेत, असा आरोपही यावेळी करण्यात आला. किसान सभेतर्फे एनआरसीच्या माजी कामगारांनी आजची जनसुनावणी हा जाणीवपूर्वक केलेला बनाव आहे, असा गंभीर आरोप केला. कोणतीही तयारी करता येऊ नये म्हणून गणेशोत्सवात सुनावणीची तारीख जाहीर केली. आमचा या प्रकल्पाला विरोध असून, सुनावणीसाठी आणखी एक महिना संधी द्यावी. सध्याच्या सुनावणीने आम्हाला अभ्यासासाठीची संधी नाकारली गेली आहे, असेही किसान सभेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले. उल्हास, काळू या प्रमुख नद्या या परिसरातून वाहतात. कंपनीकडून वापरलेल्या पाण्याचे शुद्धीकरण करू असे सांगितले जात आहे. पण शेवटी त्याचा निचरा हा नदीतच होईल. त्यामुळे या नदीचे पाणी पिणाऱ्या लाखो लोकांचा जीव धोक्यात येईल. कंपनीच्या अहवालात प्रदूषण कमी होईल, असे म्हटले आहे. पण सिमेंट कारखान्यामुळे प्रदूषण होणारच नाही, असा उल्लेख नाही. त्यामुळे जलप्रदुषणासोबतच हवा प्रदुषणही होणार आहे, असा मुद्दा अधोरेखित करण्यात आला. हा परिसर दाट लोकवस्तीचा आहे. त्यामुळे कमी लोकवस्तीच्या ठिकाणी असे कारखाने का उभारत नाही, असा मुद्दा अटाळी येथील मोहन पाटील यांनी मांडला. रिपब्लिकन सेनेच्या माया कांबळे यांनी अदानी, अंबानी, मोदी यांच्याकडे दुसरे प्रकल्प नाहीत का, असा सवाल करत विरोध व्यक्त केला.अदानी समूहाच्या प्रतिनिधींनी सांगितले की, अदानी समूहाने 2020 मध्ये आंबिवली येथील 450 एकर परिसरातील नॅशनल रेयॉन कंपनी (एनआरसी) हा कारखाना ताब्यात घेतला. तेव्हा येथे लॉजिस्टिक पार्क उभारला जाणार असल्याचे सांगण्यात आले होते.

त्यानंतर 2022 मध्ये अदानी समूहाने अंबुजा सिमेंट ही अग्रणी सिमेंट कंपनी विकत घेतली. याच अदानी अंबुजा सिमेंटने एनआरसीच्या जागेत सिमेंट कारखाना उभारण्याकरता स्थानिक पर्यावरणाचा अभ्यासाचा कार्यकारी अहवाल प्रदूषण नियंत्रण मंडळाला सादर केला. ऑक्टोबर ते डिसेंबर 2023 या काळात हा पी अँड एम या नोएडाच्या कंपनीने अंबुजा सिमेंटसाठी हा अभ्यास केला. याच अहवालानंतर मंडळातर्फे आजच्या जनसुनावणीचे आयोजन करण्यात आले होते.आंबिवली, मोहने, अटाळीसह आजूबाजूच्या जवळपास 10 गावांमधून सह्यांची मोहीम राबवत रहिवाशी, एनआरसी कंपनीचे माजी कामगार एकवटले आहेत. आजच्या जनसुनावणीतूनही स्थानिक आगरी-कोळी बांधव, नागरिक, पर्यावरण कार्यकर्ते, प्रकल्पग्रस्त यांचा रोष समोर आला. वेगवेगळ्या पक्षांचे कार्यकर्ते, पदाधिकारी यांनीही पक्षीय पातळीवर नागरिकांना पाठिंबा देत अदानींच्या कंपनीला विरोध केला. भाजपा पदाधिकारी मात्र असा विरोध करताना दिसले नाहीत. ठाण्याचे अतिरिक्त जिल्हाधिकारी हरिश्चंद्र पाटील, प्रदूषण नियंत्रण मंडळाचे कल्याण कार्यालयातील वरिष्ठ अधिकारी जयवंत हजारे यांच्या प्रमुख उपस्थितीत ही जनसुनावणी झाली. अदानी समूहातफेर्ही नागरिकांच्या प्रश्नाला उत्तरे देण्यात आली. सकाळी पाऊणे बाराला सुरू झालेला जनसुनावणी दुपारी अडीच वाजेपर्यंत चालली. अदानी समूहाच्या प्रतिनिधींनी सांगितले की, पर्यावरणाबद्दलच्या सर्व कायद्यांचे पालन करूनच हा प्रकल्प पुढे जाईल. मुंबई महानगर परिसरातही सिमेंटचे दोन-तीन प्रकल्प आहेत. आंबिवली प्रकल्पात केवळ ग्राईंडिंग केले जाणार आहे. जवळपास 70 टक्के मालावर इतरत्र असलेल्या एकात्मिक सिमेंट कारखान्यात प्रक्रिया केली जाईल. इथे त्यावर ग्राईंडिंग आणि पॅकेजिंग होईल. त्यामुळे फार कमी प्रमाणात प्रदूषण होईल. ध्वनी प्रदूषण रोखण्यासाठी मार्गदर्शक नियमावलीपेक्षाही अधिक काळजी घेऊ. कोणत्याही प्रकारचा बॉयलर प्रस्तावित नाही. आमच्या या कारखान्यासाठी खूप कमी पाणी लागते. परवानगी मिळाली, तरच स्थानिक पाणी वापरले जाईल. स्थानिकांना रोजगारामध्ये प्राधान्य देऊ.प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले, की आजच्या जनसुनावणीत कोणताही निर्णय होणार नाही. जनसुनावणीचा अहवाल तयार करून तो सरकारकडे पाठवला जाईल. त्यानंतरच निर्णय होईल.

# होमिओपॅथीची ॲलोपॅथीला पोटदुखी!



**म**हाराष्ट्र शासनाने होमिओपॅथी डॉक्टरांची महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलमध्ये नोंदणी करण्याची प्रक्रिया पुन्हा सुरू केली आहे. या निर्णयाला इंडियन मेडिकल असोसिएशनकडून तीव्र विरोध होत आहे. होमिओपॅथी आणि ॲलोपॅथी यांच्यातील वाद हा केवळ महाराष्ट्रापुरता मर्यादित नाही, तर तो संपूर्ण देशभरात अधूनमधून उफाळून येत असतो. विशेषतः जेव्हा शासन काही निर्णय घेते आणि त्याचा थेट परिणाम वैद्यकीय व्यवसायाशी जोडला जातो, तेव्हा हा प्रश्न अधिक तीव्र होतो. मात्र या विरोधामागे केवळ रुग्णांच्या सुरक्षेची चिंता आहे असे म्हणणे तितकेसे पटण्यासारखे नाही. त्याऐवजी यात एक प्रकारची व्यावसायिक मक्तेदारी जपण्याचा प्रयत्न आहे, असे अनेकांना वाटते. प्रथम हे लक्षात घेतले पाहिजे की होमिओपॅथी ही उपचारपद्धती भारतात लोकप्रिय आहेच. शिवाय तिला कायदेशीर दर्जाही आहे. सेंट्रल कौन्सिल ऑफ होमिओपॅथी ही विधिसंमत शिक्षण व व्यावसायिक मान्यता देणारी प्राधिकृत संस्था आहे. भारतातील लाखो रुग्ण आजही होमिओपॅथीकडे आकर्षित होतात. केवळ ग्रामीण भागातच नव्हे तर शहरी भागातही अनेक कुटुंबांमध्ये होमिओपॅथीला एक विश्वासार्ह उपचारपद्धती मानले जाते. तिच्या प्रभावावर प्रश्नचिन्ह उपस्थित करणारे काही जरी असले, तरी प्रत्यक्ष अनुभवाने समाधानी झालेले रुग्ण कमी नाहीत. अशा वेळी शासनाने होमिओपॅथी डॉक्टरांना वैद्यकीय क्षेत्रात योग्य दर्जा देण्याचा निर्णय घेतला, त्यामुळे तो तर्कसंगत मानायला हवा.

ॲलोपॅथी डॉक्टरांचा मुख्य आक्षेप असा आहे की, होमिओपॅथी शिकलेल्या व्यक्तींना ॲलोपॅथी औषधे आणि उपचार पद्धतीचे सखोल ज्ञान नसते. त्यामुळे जर त्यांना ॲलोपॅथी उपचार करण्याची परवानगी दिली, तर रुग्णांना धोका निर्माण होऊ शकतो. या मुद्द्याला वरवर पाहता काही प्रमाणात अर्थ आहे. परंतु प्रत्यक्षात होमिओपॅथी डॉक्टरांना दिली जाणारी परवानगी ही अंधाधुंद ॲलोपॅथी उपचार करण्यासाठी नसते. शासन अशा डॉक्टरांना अल्पकालीन ब्रिज कोर्स, प्रशिक्षण किंवा मर्यादित स्वरूपात ॲलोपॅथी वापरण्याची संधी देते. यामागील उद्दिष्ट म्हणजे ग्रामीण आणि दुर्गम भागांमध्ये डॉक्टरांची टंचाई दूर करणे. आज महाराष्ट्रातील असंख्य प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये एमबीबीएस डॉक्टर उपलब्ध नाहीत. अशा परिस्थितीत होमिओपॅथी किंवा आयुर्वेदिक शिक्षण घेतलेले डॉक्टर हे ग्रामीण आरोग्य सेवेत मोठा आधार ठरतात. जर त्यांना काही प्रमाणात ॲलोपॅथीचा वापर करण्याची परवानगी दिली, तर तिथल्या रुग्णांना तातडीची सेवा मिळू शकते. ॲलोपॅथी डॉक्टरांकडून वारंवार दावा केला जातो की, केवळ त्यांच्या शिक्षणातच पुरेशी काटेकोरता, क्लिनिकल प्रॅक्टिस आणि अनुभव आहे. पण हेही मान्य केले पाहिजे की होमिओपॅथी डॉक्टरांचे शिक्षणही चार ते पाच वर्षांचे असते, त्यातही शरीरशास्त्र, शरीरक्रिया, रोगनिदान, औषधशास्त्र यांचा सखोल अभ्यास असतो. म्हणजेच ते डॉक्टर पूर्णपणे अज्ञानी नसतात. होमिओपॅथीचे मूलभूत तत्त्व वेगळे असले तरी मानवी शरीराच्या रचना आणि कार्यप्रणालीबाबत त्यांच्याकडे वैज्ञानिक ज्ञान असते. त्यामुळे अल्पकालीन ॲडिशनल प्रशिक्षणानंतर ते ॲलोपॅथीतील प्राथमिक सेवा देऊ शकतील, असा विश्वास ठेवण्यात काही गैर नाही. या प्रकरणात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे रुग्णांचा अधिकार. रुग्णाला उपचार कोणत्या पद्धतीने घ्यायचे हे निवडण्याचा अधिकार आहे. जर एखाद्या रुग्णाचा होमिओपॅथीवर विश्वास असेल आणि त्याने त्या उपचारांचा लाभ घ्यायचे ठरवले असेल, तर त्याला तो पर्याय उपलब्ध असणे आवश्यक आहे. ॲलोपॅथी डॉक्टरांनी होमिओपॅथीवर सरसकट अविश्वास दाखवणे आणि त्या पद्धतीला दुय्यम दर्जा देणे हे रुग्णांच्या निवडीवर घाला घालणारे ठरते.

याशिवाय, भारताच्या आरोग्य व्यवस्थेत सर्वच उपचार पद्धतींना त्यांचे म्हणून स्थान आहे. आयुर्वेद, युनानी, सिद्ध, होमिओपॅथी या सर्व प्रणालींना शासनाने मान्यता दिलेली आहे. जर शासनाने त्यातील डॉक्टरांना योग्य प्रशिक्षण घेऊन मर्यादित प्रमाणात ॲलोपॅथी उपचार करण्याची परवानगी दिली, तर त्यात चुकीचे काही नाही. खरंतर हा उपाय आरोग्य व्यवस्थेची व्याप्ती वाढवतो आणि लोकांना अधिक सोयीस्कर सेवा मिळवून देतो. ॲलोपॅथी डॉक्टरांचे म्हणणे आहे की, अशा निर्णयामुळे भोंदू डॉक्टरांची संख्या वाढेल. पण वास्तवात शासनाकडून नोंदणी प्रक्रियेत पारदर्शकता ठेवली आणि केवळ मान्यताप्राप्त महाविद्यालयांतून पदवी घेतलेल्या होमिओपॅथी डॉक्टरांना ही संधी दिली, तर भोंदू डॉक्टरांचा प्रश्नच उद्भवणार नाही. उलट, योग्य पात्रता असलेले हजारो डॉक्टर रोजगारक्षम होतील आणि ते शासनाच्या आरोग्य धोरणाला पूरक ठरतील. आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे डॉक्टरांच्या संपामुळे रुग्णांना भोगावे लागणारे हाल. जर ॲलोपॅथी डॉक्टरांचे आंदोलन वारंवार अशा पद्धतीने होत राहिले, तर सामान्य माणसाच्या मनात त्या व्यवसायाविषयी नकारात्मक भावना निर्माण होते. उलट, होमिओपॅथी डॉक्टर हे संपाचे हत्यार न वापरता सतत सेवा देत राहतात. त्यामुळे सामाजिकदृष्ट्या त्यांचा स्वीकार वाढतो. अशा वेळी शासनाने ॲलोपॅथी डॉक्टरांच्या दबावाला बळी न पडता, व्यापक लोकहिताचा विचार करणे आवश्यक आहे. शेवटी आरोग्य ही माणसाची मूलभूत गरज आहे. ती फक्त एखाद्या एकाच उपचारपद्धतीच्या मक्तेदारीत राहता कामा नये. आधुनिक काळात बहुविध उपचार पद्धती परस्परपूरक ठरतात. एखाद्या रोगात ॲलोपॅथी उपयोगी पडते, तर काही दीर्घकालीन व्याधींमध्ये होमिओपॅथीचा फायदा होतो. त्यामुळे शासनाने या सर्व पद्धतींमध्ये समन्वय साधण्याचे काम केले पाहिजे. होमिओपॅथी डॉक्टरांना योग्य पात्रतेच्या चौकटीत नोंदणी देणे हे त्याच दिशेने

# पनीर कटलेट

**साहित्य :** २०० ग्रॅम पनीर कुस्करून, २ मध्यम आकाराचे कांदे चिरून, १ गाजर किसून, १ वाटी बारीक चिरलेला कोबी, २ बटाटे उकडून कुस्करून, १ चमचा आले-लसूण पेस्ट, १ चमचा मिरची-कोथिंबीर पेस्ट, २ मोठे चमचे कॉर्नफ्लॉवर, गरजेनुसार मिठ, पाव ते अर्धा वाटी तेल, चाट मसाला.

**कृती :** भांड्यात तेल गरम करून त्यावर चिरलेला कांदा घाला. कांदा गुलाबी रंग येईपर्यंत शिजला की त्यावर



आले-लसूण पेस्ट व मिरची-कोथिंबीर पेस्ट घालून ढवळा. वरील मिश्रणावर कोबी, गाजर घालून २-३ मिनिटेच परतवत शिजवा. चायनीज पदार्थांसारखेच जास्त शिजू देऊ नका. आता कुस्करलेले बटाटे, मिठ घालून पुन्हा चांगले ढवळून लगेच गॅस बंद करा. हे मिश्रण एका ताटात पसरवा व जरा थंड होऊ द्या. मिश्रण थंड झाले की त्यात पनीर व कॉर्नफ्लॉवर टाकून मिश्रण एकजीव करा. आता तुम्हाला हव्या त्या आकाराचे कटलेट करा. व नॉनस्टिक पॅनवर जरासेच तेल घालून शॅलो फ्राय करून घ्या. दोन्ही बाजू मध्यम आचेवर साधारण ५-६ मिनिटे शिजवा. कटलेट तयार झाले की गरम असतानाच त्यावर चाट मसाला टाका. नुसते किंवा सॉस किंवा पुदिना चटणीबरोबर याचा आस्वाद घ्या.

**अधिक टिप :**

- **या कटलेटमध्ये इतर कोणतेही मसाले न वापरल्याने पनीर व भाज्यांचा अस्सल स्वाद येतो.**
- **लहान मुलांना तर खूपच आवडतात. शिवाय कोबीसारखी भाजी खाल्ली जाते.**
- **यात अजून कांद्याची पात, किंवा आपल्या आवडीच्या भाज्या थोड्या प्रमाणावर घालू शकता.**

# न्यूड मेकअप लूकसाठी काही टिप्स



**न्यूड मेकअप लूकचा सध्या खूपच वापर केला जातो. यासाठी ब्लॅक मस्कराचा वापर करा. आपल्याला त्वचेला सूट होईल असा नैसर्गिक रंग आणि गुलाबी रंगाच्या लिप कलरचा वापर करा. आकर्षक दिसण्यासाठी न्यूड मेकअप लूकसाठी कोणत्या टिप्सचा वापर केला पाहिजे, ते जाणून घ्या.**

- आपल्या डोळ्यांना नॅचरल लूक देण्यासाठी पापण्यांना ब्लॅक मस्करा लावा आणि केस कुरळे करा.
- डोळ्यावरच्या आतील कोपऱ्यापर्यंत काजळ लावा. त्यामुळे पापण्या सुंदर आणि आकर्षक दिसतील.
- गालावर नॅचरल चमक येण्यासाठी चीकबोन्सला हायलाइट करा. सध्या न्यूड मेकअप लूकसाठी आपल्या त्वचेला सूट होईल अशा नॅचरल शेडची निवड करा.
- यासाठी हलक्या रंगाचा वापर करा. चेहरा चमकण्यासाठी ओठांना हलक्या गुलाबी रंगाची पिंक शेडची लिपस्टिक लावून त्यावर शाईन येण्यासाठी लिप ग्लॉसचा वापर करा. त्यामुळे अजूनच आकर्षक लूक येईल.
- न्यूड मेकअप लूकसाठी एकाच रंगाच्या वेगवेगळ्या शेड्सचा वापर करा.
- न्यूड शेड्स लावण्याआधी लाईट बेस लावा आणि आवश्यक असल्यास हलक्या हातांनी लूज पावडर किंवा कॉम्पॅक्ट पावडर लावा.

# गरम पाणी पिण्याचे फायदे

**बहुतेक लोक आपल्या दिवसाची सुरुवात चहा किंवा कॉफीच्या गरमागरम कपाने करत असतात. काही लोकांना तर सकाळी उठल्या उठल्या चहा किंवा कॉफी मिळाली नाही, तर त्यांचा अख्खा दिवस वाईट जातो, इतकी त्यांना चहा किंवा कॉफीची सवय झालेली असते. पण या सवयीमुळे कालांतराने बद्धकोष्ठ, पोटदुखी, ॲसिडिटी, पिंपल्स अशा तक्रारी सुरू होतात. असे म्हटले जाते की त्वचा, केस आणि एकंदर शरीराचे आरोग्य सांभाळण्यासाठी भरपूर पाणी पिणे आवश्यक आहे. त्याचबरोबर सकाळी उठल्या उठल्या एक ग्लास गरम पाणी पिण्याची सवयही तुमच्या शरीरातील अनेक विकार मुळापासून दूर करू शकते.**

**सकाळी** उठून नियमितपणे एक ग्लास गरम पाणी प्यायल्याने पचन शक्ती चांगली राहते. तसेच गरम पाणी प्यायल्याने शरीरातील रक्ताभिसरणही चांगले राहते. आपल्या खाण्या-पिण्याच्या अयोग्य सवयींमुळे आपल्या शरीरामध्ये साठत असलेले घातक पदार्थ गरम पाण्याच्या सेवनामुळे बाहेर टाकण्यास मदत होते. तसेच गरम पाण्याच्या नियमित सेवनामुळे शरीरातील अतिरिक्त चरबी घटण्यास मदत होऊन वजन कमी होण्यास मदत होते. योगशास्त्राच्या नियमानुसार तीन महिने गरम पाण्याच्या सेवनाने वजन कमी होऊ शकते. याकरिता इतर कोणतीही विशेष पथ्ये पाळण्याची गरज नाही.

काही लोकांना बद्धकोष्ठाचा त्रास होतो. अशा वेळी सकाळी रिकाम्यापोटी गरम पाणी पिणे फायदेशीर ठरू शकते. पुष्कळ महिलांना मासिक धर्माच्या दिवसांमध्ये डोकेदुखी सतावते. त्यावेळी नियमित गरम पाण्याचे सेवन केल्याने डोकेदुखीपासून आराम मिळतो. तसेच या दिवसांमध्ये होणारी पोटदुखी ही गरम पाण्याच्या सेवनामुळे कमी होते.



दररोज सकाळी एक ग्लास गरम पाण्यामध्ये थोडासा लिंबाचा रस घालून प्यायल्याने शरीराची रोगप्रतिकारशक्ती वाढते. ज्यांना सतत बारीकसारीक तब्येतीच्या तक्रारी जाणवत असतील त्यांनी गरम पाणी आणि लिंबाच्या रसाचे दररोज सेवन करणे उत्तम. यामुळे त्वचेचे आरोग्य देखील चांगले राहून, त्वचेवर पिंपल्स येणे कमी होते. तसेच गरम पाण्याच्या सेवनाने ॲसिडिटीचा त्रासही कमी होतो. पुष्कळ लोकांच्या खाण्या-पिण्याचे वेळापत्रक किंवा झोपेच्या वेळा अतिशय अनियमित असतात. शिवाय ज्या लोकांना काही ना काही कारणाने सतत प्रवास करावा लागतो. त्यांनाही बाहेरच्या जेवणावरच काम चालवून घ्यावे लागते. परिणामी ॲसिडिटीसारखे विकार पाठीमागे लागतात. अशा वेळी दररोज सकाळी गरम पाणी पिण्याच्या सवयीने ॲसिडिटीचे प्रमाण कमी होते.

# कोरफडीचे ५ गुणकारी फायदे

**कोरफड त्वचेसाठी खूप फायदेशीर आहे. याच्या नियमित सेवनाने त्वचेसंबंधित अनेक समस्या दूर होतात. जाणून घ्या कोरफडीचे गुणकारी फायदे...**

- सतत कॉम्प्युटरसमोर बसल्याने डोळ्यांवर ताण येतो. डोळ्यांचे आरोग्य चांगले राहाण्यासाठी दोन चमचे कोरफडीचा गर एक कप पाण्यात मिसळून त्याने डोळे धुवा. यामुळे डोळ्यांना आराम मिळेल.
- चेहऱ्यावर पुटकुळ्या आल्यास कोरफडीचा गर चेहऱ्यावर लावा. थोड्या वेळाने चेहरा साध्या पाण्याने धुवा. यामुळे पुटकुळ्या कमी होतील.
- शरीरावर कापल्यामुळे जखम झाली असल्यास त्यावर कोरफडीचा गर लावा.
- कोंड्याची समस्या असल्यास दोन चमचे कोरफडीचा गर कंडिशनरसोबत मिसळा. यामुळे कोंड्यापासून सुटका होईल.
- दातांच्या हिरड्या मजबूत करण्यासाठी हिरड्यांवर कोरफडीचा गर लावा.

# जाणून घ्या टिकली लावल्याने होणारे फायदे



**टिकलीचाही महिलांच्या १६ शृंगारांमध्ये समावेश असून सौभाग्यवती महिला काही वर्षांपूर्वी कुंकवाचा वापर करत असत. पण कुंकवाचा वापर न करता टिकलीचा वापर सध्या महिलावर्ग मोठ्या प्रमाणात करताना पाहायला मिळतात. महिला चेहऱ्यावर लावण्यात आलेल्या टिकलीमुळे केवळ सुंदरच दिसत नाहीत तर त्याचे अनेक आरोग्यदायी फायदेही आहेत. टिकलीचा वापर सामान्यतः महिला ट्रेडिशनल लूकसाठी करतात. पण एका अभ्यासानुसार आरोग्यालाही टिकलीमुळे अनेक फायदे होतात. यामुळेच टिकलीचा वापर अनेक महिला करत आहेत. एवढेच नाही तर वेस्टर्न कपडे परिधान करणाऱ्या महिलाही आपल्या ड्रेसनुसार कलरफुल टिकली वापरण्यास सुरुवात करत आहेत. चेहऱ्यावरील टिकलीमुळे महिला खुपच सुंदर दिसतात आणि त्यामुळे अनेक आरोग्यदायी फायदेही होतात. कपाळावर टिकली लावण्याने अनेक फायदे होतात.**

**कपाळावर** टिकली लावल्यामुळे डोके दुखणे बंद होते. ॲक्युप्रेशर शास्त्रानुसार कपाळावर ज्या ठिकाणी टिकली लावण्यात येते, त्या जागेवर मसाज केल्यास डोकेदुखी तत्काळ बंद होते. टिकली लावलेल्या जागेवर मसाज केल्यास नाकाच्या आसपास ब्लड सर्क्युलेशन चांगल्या पद्धतीने होण्यास सुरुवात होते, ज्यामुळे तुम्हाला खूपच आराम मिळतो.

टिकली दोन्ही भुवयांच्या मध्यभागी ज्या ठिकाणी लावली जाते, शरीरातील सर्व नसा त्याच केंद्रावर एकत्र येतात. टिकली लावण्यात येणाऱ्या या जागेला अग्निचक्र या नावाने सुद्धा ओळखले जाते. म्हणूनच टिकली लावल्याने एकाग्रताही वाढते आणि मन शांत राहते. तसेच, टिकली लावल्याने ताणतणावही कमी होतो.

तुम्हाला पूर्ण झोप मिळत नाही आणि त्यामुळे तुम्ही त्रस्त आहात तर टिकली लावणे तुमच्यासाठी खूपच फायदेशीर होऊ शकते. टिकली शरीरच्या वरच्या भागाला शांत ठेवण्यासाठी खूपच फायदेशीर ठरते. कपाळावर टिकली लावल्याने चांगली झोप येते.

टिकली डोळ्यांच्या नसा मजबूत करण्यास खूपच मदत करते. टिकली कपाळ्याच्या मध्यभागी ज्या ठिकाणी लावली जाते, त्या ठिकाणच्या नसा आणि डोळ्यांमधील नसा यांच्यात एक कनेक्शन असते. टिकली डोळ्यांच्या नसांना मजबूत करण्यास मदत करते ज्यामुळे तुम्हाला एकदम स्पष्ट आणि साफ दिसण्यास मदत होते. एवढेच नाही तर टिकली लावल्याने आसपासचे मसल्स मजबूत आणि हेल्दी होतात.



तुमच्या चेहऱ्यावर जर सुरकुत्या पडण्यास सुरुवात होत आहे तर टिकली लावण्यास तुम्ही सुरुवात करा. कारण, टिकली लावल्याने चेहऱ्यावर येणाऱ्या सुरकुत्यांपासून सुटका मिळण्यास मदत होते.

# मासिक पाळी पुढे ढकलताय?

**सण, समारंभ, पर्यटन किंवा धार्मिक कार्याच्या आड येणारी मासिक पाळी पुढे ढकलण्याचा निर्णय अनेक महिला घेतात. मात्र अशा प्रकारे निसर्गचक्रात हस्तक्षेप करणं चुकीचं आहे. बरंच प्रबोधन होऊनही मासिक पाळीबाबतचे गैरसमज कमी झालेले नाहीत. म्हणूनच महिलांना कृत्रिम पद्धतीने पाळी पुढे ढकलावी लागते. मासिक पाळी पुढे ढकलण्यासाठी गोळ्या घेतल्या जातात. पण या गोळ्यांचे शरीरावर दीर्घकालीन परिणाम होतात.**

- मासिक पाळी पुढे ढकलणाऱ्या गोळ्यांच्या सततच्या सेवनामुळे यासंदर्भातल्या नैसर्गिक चक्रावर परिणाम होऊ शकतो. शिवाय महिलांच्या प्रजननक्षमतेवरही याचे घातक परिणाम दिसून येतात.
- या गोळ्यांचं सेवन केल्यानंतर पुढचा काही काळ मासिक पाळीदरम्यान मोठ्या प्रमाणावर रक्तस्राव होण्याची शक्यता वाढते. जवळपास २० टक्के महिलांना हा अनुभव येतो. पुढचे काही महिने मासिक पाळीतून अधिक प्रमाणात रक्त जाऊ शकतं.
- या गोळ्या बऱ्याच काळपर्यंत घेत राहिल्यास आरोग्यावर अत्यंत घातक असे परिणाम दिसून येतात. नसांमध्ये रक्ताची गुठळी होण्यासारख्या समस्या जाणवू शकतात. या गोळ्यांमुळे इतर औषधांच्या शरीरावरच्या प्रभावावर विपरित परिणाम होऊ शकतो.
- या गोळ्या घेतल्यानंतर इतर काही दुष्परिणाम होऊ शकतात. जुलाब, हातापायांमध्ये गोळे येणं, अवेळी रक्तस्राव होणं हे दुष्परिणाम दिसून येऊ शकतात.



# शरीरात युरिक ॲसिडचे प्रमाण वाढले असेल तर या नॅचरल ड्रिंक्सने बॉडीला करा डिटॉक्स

**योग्य खानपान आणि औषधांमुळे तुम्ही शरीरात तयार होणाऱ्या युरिक ॲसिडच्या स्तराला नियंत्रित करू शकता. युरिक ॲसिडची अधिकता शरीराला बऱ्याच प्रकारे नुकसान पोहोचवते. आम्ही तुम्हाला अशा काही नॅचरल ड्रिंक्सबद्दल सांगत आहोत ज्याचे सेवन केल्याने शरीरातील युरिक ॲसिडचे स्तर कमी होतील आणि तुम्हाला त्याचा योग्य फायदा देखील मिळेल.**



**नारळपाणी**

युरिक ॲसिडच्या स्तराला नियंत्रित करण्याचा सर्वात उत्तम उपाय पाणी आहे. पाण्याशिवाय नारळपाणी देखील युरिक ॲसिडला नियंत्रित करतो. हे युरिक ॲसिडला पातळ करून किडनीला उत्तेजित करतात ज्यामुळे शरीरातून युरिक ॲसिड मूत्राच्या माध्यमाने बाहेर निघून जाते.

**मोसंबी आणि पुदिना**

या ड्रिंकमध्ये पर्याप्त मात्रेत व्हिटॅमिन असतात, जे युरिक ॲसिडच्या स्तराला कमी करण्यास मदत करतात. याचे सेवन करण्यासाठी मोसंबीचे साल काढून त्याच्या बारीक बारीक फोडी करून त्यात लिंबाचा रस आणि पुदिन्याचे पान घालावे व या मिश्रणाला मिक्सरमधून फिरवून त्याचा ज्यूस काढावा व त्याचे सेवन करावे.

**ब्लॅक चेरी आणि चेरी**

ब्लॅक चेरी आणि चेरीचा ज्यूस युरिक ॲसिडमुळे होणारे संधिवात किंवा किडनी स्टोनच्या समस्येसाठी योग्य आहे. ब्लॅक चेरी युरिक ॲसिडच्या सीरम स्तराला कमी करून संधिवात आणि किडनीहून क्रिस्टल दूर करण्यास मदत करते. यात अँटीऑक्सिडेंट आणि अँटी इंफ्लेमेंटरी गुणदेखील असतात, जे युरिक ॲसिडला कमी करण्यास मदत करतात.

**खिऱ्याचे सूप**

खिऱ्याचे सूप शरीराला हायड्रेड ठेवण्यासोबत युरिक ॲसिडच्या स्तराला कमी करतो. याचे सेवन करण्यासाठी एका भांड्यात खिऱ्याचा ज्यूस, पाव कप योगर्ट, पुदिन्याचे पान आणि लिंबाचा रस घालून मिक्सरमधून फिरवून घ्या आणि थोड्या वेळाने गार झाल्यावर त्याचे सेवन करा.

**सेबचा सिरका**

सेबचा सिरका शरीरातून युरिक ॲसिडला दूर करण्यास मदत करतो. अँटीऑक्सिडेंट आणि एंटीइंफ्लेमेंटरी गुणांमुळे हे शरीरात क्षारीय ॲसिड संतुलन बनवून ठेवतो. हा सिरका रक्ताच्या पीएच वॉल्यूमला वाढवून युरिक ॲसिडला कमी करण्यास मदत करतो.

**अननसाचा ज्यूस**

या ज्यूसमध्ये व्हिटॅमिन सी सोबत इतर अँटीऑक्सिडेंट असतात जे युरिक ॲसिडच्या स्तराला कमी करून शरीरातून बाहेर काढण्यात मदत करतात. याचे सेवन केल्याने शरीराला दुसरे इतर फायदेदेखील मिळतात.

# नाश्त्यामध्ये ब्रेड, कॉर्नफ्लेक्स खाणे शरीरासाठी हानीकारक

**सकाळच्या** नाश्त्यामध्ये अधिक जणांना ब्रेड, कॉर्नफ्लेक्स आणि अनेक तळलेले पदार्थ खाण्याची सवय असते. मात्र हे पदार्थ फुफ्फुसाच्या कॅन्सरला कारणीभूत ठरत असल्याचे नव्या संशोधनात समोर आलेय. व्हाईट ब्रेड, कॉर्नफ्लेक्स असे ग्लायसेमिक इंडेक्सयुक्त पदार्थ खाल्ल्याने फुफ्फुसाचा कॅन्सर वाढण्याची शक्यता असते. संशोधनादरम्यान ज्यांना हा आजार झाला होता अशा एक हजार ९०५ जणांना समाविष्ट केले होते. त्याचबरोबर दोन हजार ४१३ स्वस्थ व्यक्तींचेही निरीक्षण करण्यात आले. यादरम्यान त्यांच्या आहाराच्या सवयी जाणून घेतल्या. शोधकर्त्यांचे म्हणणे आहे की तंबाखू तसेच धूम्रपान न करणाऱ्या लोकांमध्येही फुफ्फुसाच्या कॅन्सरची लक्षणे आढळली. ज्यावरून त्यांच्या आहाराच्या सवयी या कॅन्सरसाठी कारणीभूत असल्याची शक्यता आहे.



# अनशापोटी करा गुळाचे सेवन

**अनशापोटी गूळ खाल्ल्यास ४ फायदे होतात. आपल्यापैकी बहुतेक लोक रात्री जेवल्यानंतर गूळ खातात. त्यामुळे जेवण पचण्यास मदत होते. अनशापोटी गूळ खाल्ल्यावर कोमट पाणी प्यायल्यास त्याचे आरोग्यासाठी अनेक फायदे असतात.**

**रक्तदाब नियंत्रणात राहातो :** रक्तदाब नियंत्रणासाठी गूळ प्रभावी ठरतो. गुळामध्ये भरपूर प्रमाणात कॅल्शिअम आणि फॉस्फरस आढळते. हे हाडांच्या मजबुतीसाठी आवश्यक आहेत. गुळाबरोबर आले सेवन केल्यास सांधेदुखीपासून मुक्ती मिळते.



**रक्त साफ होते :** सकाळी अनशापोटी गूळ खाऊन कोमट पाणी प्यायल्यास रक्त स्वच्छ होते. त्यामुळे नवीन रक्त तयार होते. हृदयरोग होण्याचा धोका दूर ठेवण्यासही गुळाच्या सेवनाचा फायदा होता.

**शरीराला मिळते ताकद :** गुळाच्या नियमित सेवनाने शरीर ताकदवान होते. दिवसभराचा थकवा दूर होण्यासही मदत होते. शरीरात ऊर्जा पातळी कायम राहाते आणि ती कमी होत नाही.

**पचनसंस्था मजबूत होते :** ज्या लोकांना आहार सहजपणे पचवण्यात अडचणी येतात त्यांनी गूळ आणि गरम पाणी सेवन करावे. या व्यक्तींसाठी ते औषधासारखे कामकरते. त्याचबरोबर बद्धकोष्ठता, पोटात वायू होणे, ॲसिडीटीसारख्या समस्यांपासून सुटका होण्यास मदत होते.

# ‘या’ चुका टाळल्या तर लग्नात वधूचा मेकअप होणार नाही खराब!



**घरात लग्नकार्य असलं की कामाची नुसती लगबग सुरू असते. धावपळ, धांदल असा सगळा माहोल असतो. मात्र अशा वातावरणातही एक आनंद, उत्साह असतो. लग्न म्हणजे दोन जिवांचंच नव्हे तर दोन कुटुंबांचं मीलन असतं. त्यामुळे हा दिवस घरातल्या प्रत्येकासाठी खास असतो. त्यातच वधू-वरांचा थाट तर काही औरच असतो. प्रत्येकाचं लक्ष या दोघांकडेच वेधलेलं असतं. लग्नात आलेल्या पाहूण्यांच्या नजरा, कॅमेरा हे जणू वधू-वरांकडेच केंद्रित झालेले असतात. त्यामुळे लग्नात सुंदर दिसण्यावर या दोघांचाही भर असतो. त्यातच वधू असेल तर विचारायलाच नको. अगदी साड्यांपासून मेकअपपर्यंत प्रत्येक गोष्ट खास असण्यावर तिचा भर असतो. मेकअपमुळे सौंदर्यात भर पडतेच. मात्र बऱ्याच वेळा उत्तम प्रतीच्या मेकअपचं सामान वापरूनही तो मेकअप नीट सेट होत नाही किंवा ऐनवेळी तो खराब दिसून लागतो. हे असं का होतं यामागे बरीच कारणं आहेत. यामध्ये आपल्या बदललेल्या जीवनशैलीचादेखील समावेश आहे.**

**हेअर कलर :** बदलत्या काळानुसार रोज नवनवी ट्रेंड बाजारात येत असतात. सध्या तरुणाईमध्ये हेअर कलर करण्याची क्रेझ दिसून येत आहे. त्यामुळे बऱ्याच तरुणी वेगवेगळ्या रंगांनी केस कलर करत असतात. पण काही वेळेस उत्सुक होऊन केलेला हेअर कलर त्यांचा चेहऱ्याला शोभून दिसत नाही. त्यामुळे लग्नासाठीचा लुक खराब होऊ शकतो. हेअर कलर व्यवस्थित सेटल होण्यासाठी १० ते १५ दिवस लागतात. त्यामुळे लग्नाच्या ४ ते ५ दिवस आधी हेअर कलर केल्यास जो लूक आपल्याला अपेक्षित आहे तो मिळणार नाही. म्हणूनच लग्नापूर्वी जर केस कलर करायचे असतील तर निदान महिनाभर आधी कलर करावेत.



**हेअरकट :** हेअर कलरप्रमाणे हेअरकट देखील लग्नाच्या ४-५ दिवस आधी करू नये. कधी कधी हेअरकट आपल्याला हवा तसा होतं नाही किंवा तो ब्रायडल लूकला साजेसा नसतो. त्यामुळे लग्नात हेअरस्टाइल करताना अडचणी येऊ शकतात. त्यामुळे महिनाभर आधी हेअरकट केल्यास ते चांगले ठरते.


**लग्नापूर्वी सुंदर दिसण्यासाठी केलेले उपाय :** लग्नात सुंदर दिसावं ही प्रत्येक तरुणीची इच्छा असते. त्यामुळे बऱ्याच वेळा मुली फेशिअल, ब्लिच, क्लीनअप असे नानाविध प्रकार करतात. पण लग्नाच्या ४-५ दिवसआधी ब्यूटी ट्रीटमेंट करणं नुकसानदायक ठरत. कारण काही मुलींची स्कीन सेन्सिटीव्ह असते, काहींची ड्राय तर काहींची ऑइली असते. त्यामुळे अशा त्वचेसाठी वेगवेगळ्या ब्युटी ट्रीटमेंट असतात. मात्र काही वेळा योग्य प्रोडक्ट किंवा क्रीम न वापरल्यामुळे त्याचा परिणाम चेहऱ्यावर होऊ शकतो. चेहऱ्यावर लाल पूरळ किंवा पुटकुळ्या येऊ शकतात.

**अतिरिक्त व्यायाम :** लग्नात बारीक दिसावं याकडे मुलींचा जास्त कल असतो. त्यामुळे मुली बऱ्याचदा लग्नापूर्वी डाएट, व्यायाम करतात. तसंच लग्नाच्या १०-१२ दिवस आधी हार्ड वर्कआऊट करतात. परंतु यामुळे त्या थकतात आणि सोबतच चेहरा ही अगदी फिका पडतो.

**फास्ट फूड खाणे :** लग्नात मेकअपमुळे तर आपलं सौंदर्य वाढतंच मात्र त्याचप्रमाणे चेहऱ्यावर तजेला असणंही गरजेचं आहे. तजेला असेल तरच सौंदर्यात भर पडते. नितळ आणी सतेज चेहरा हवा असेल तर आपल्या आहाराकडे विशेष लक्ष देणं गरजेचं आहे. या काळात फास्ट फूड खाणं कमी करावं आणि पौष्टीक पदार्थ खाण्यावर भर द्यावा. फास्ट फूड खाल्यामुळे बऱ्याचदा चेहऱ्यावर पिंपल्स येण्याची शक्यता असते. त्यामुळे शक्यतो फास्ट फूड टाळावे.

# घसादुखीवर ‘हे’ झटपट घरगुती उपाय नक्की येतील कामी

**ऋतू** बदलले की शरीराच्या अनेक समस्या उद्भवतात. तसेच थंडीत अंगदुखी, पाठदुखीसोबत घसा खवखवणे, घसा दुखणे असे आजार देखील उद्भवतात. अशा वेळी आपल्याला कधी कधी गिळताना, बोलताना घशाला त्रास होतो. यालाच Throat inffection असेही म्हणतात. साधारणतः सर्दी, खोकला याप्रमाणे हा घशाला होणारा त्रास हे देखील व्हायरल इन्फेक्शन आहे. हे इन्फेक्शन काही दिवसांत आपोआप कमी होते. यामुळे याच्यावर काही इलाज करु नये असेही नाही. त्या समस्येकडे लक्ष न दिल्यास घशाला सूज येणे, टॉन्सिल्स लाल होणे, त्यावर पांढरे चट्टे येणे यांसारखे गंभीर आजार होऊ शकतात. अशा वेळी मग यावर त्वरित काय उपाय करता येईल अशा प्रश्न अनेकदा पडतो. म्हणूनच यावर झटपट घरगुती उपाय कोणते करता येईल ते पाहूया..



१. घशाला सूज उतरवण्यासाठी गरम पाणी पिण्याचे व हळद मिठाच्या पाण्याच्या गुळण्या करता येतील.

२. घसा दुखत असल्यास तोंडात आल्याचा तुकडा ठेवल्यास थोडा आराम मिळतो.

३. आलं, टोमॅटो आणि मधाचा रस एकत्र करून घेतल्याने घसादुखीपासून आराम मिळतो.

४. मध आणि कांदा टाकून उकळलेलं पाणी गाळून ते थोड्या-थोड्या वेळाने प्यावे.

५. पाण्यात बडीशेप टाकून ते पाणी उकळून घ्यावं आणि त्यानंतर त्यात मध टाकून हे पाणी थोड्या थोड्या वेळाने प्यावे. याने घशाला आराम मिळेल.

याप्रमाणेच लिंबाचा रस आणि मध टाकलेले गरम पाणी प्यायल्यानेही घशाला आराम मिळतो. लवंग चघळल्यानेही घसादुखी कमी होते. थंडीत तुम्हाला जर तुम्हाला घसादुखीचा त्रास उद्भवत असेल तर हे उपाय नक्कीच मदत करतील.

# नवीन कबुतरखान्यांसाठी मुंबईत जागाच नाही

■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक



लोकवस्तीपासून ५०० मीटर लांब जागा शोधून तेथे कबुतरखाने सुरू करता येतील का याची मुंबई महापालिकेतर्फे चाचपणी सुरू आहे. मात्र नव्या कबुतरखान्यांसाठी मुंबई अशा जागाच नसल्याचे आढळून आले आहे. लोकवस्तीपासून लांब अशा जागा शोधून अहवाल सादर करण्यासाठी मुंबई महापालिकेच्या विभाग कार्यालयांना आदेश दिले होते. मात्र बहुतांशी विभाग कार्यालयांनी अशा जागा नसल्याचा अहवाल दिला आहे. कबुतरखाने बंद करण्याबाबतचा वाद न्यायालयात पोहोचला असून त्याला राजकीय वळणही आले आहे. त्यामुळे कबुतरखाने सुरू करायचे झाल्यास लोकवस्तीपासून ५०० मीटर अंतरावर कबुतरखाने तयार करता येतील का याची चाचपणी मुंबई महापालिका करीत आहे. अशा जागा विभाग स्तरावर शोधल्या जात आहेत. मुंबई महापालिकेच्या आरोग्य विभागाने शुक्रवारी सहाय्यक आयुक्तांना कबुतरखाने सुरू करण्याकरीता योग्य जागा शोधण्याचे आदेश दिले होते. तसेच त्याबाबतचा अहवाल गुगल शीटवर भरून देण्यास सांगितले होते. मात्र संध्याकाळी उशीरापर्यंत बहुतांशी विभाग कार्यालयांनी अशा जागा नसल्याचाच अहवाल दिल्याचे समजते. मुंबई प्रत्येक भाग अत्यंत गजबजलेला असून आधीच अत्यंत दाटीवाटीने या ठिकाणी लोक राहतात. त्यामुळे लोकवस्तीपासून ५०० मीटर अंतर दूर या निकषात कोणत्याही विभागात जागा सापडणे अवघड आहे. काही विभाग कार्यालयांनी अशा जागा शोधल्या आहेत, मात्र त्यावर आरक्षण आहे का हे देखील तपासून बघावे लागणार आहे. मुंबईतील कबुतरखाने बंद करण्यासाठी मुंबई महापालिकेने तत्काळ मोहीम राबवावी, असे निर्देश राज्य सरकारने पावसाळी अधिवेशनात दिले होते. त्यानंतर मुंबई महापालिकेने दुस□याच दिवशी दादरच्या प्रसिद्ध कबुतरखान्यावर कारवाई केली होती. कबुतरखान्याच्या वरील अनधिकृत बांधकाम हटवले, तसेच कबुतरांसाठी जमा केलेले खाद्यही हटवले. पालिकेच्या या कारवाईच्या विरोधात काही पक्षीप्रेमींनी उच्च न्यायालयात धाव घेतली होती. या याचिकेवरील सुनावणीच्या वेळी उच्च न्यायालयाने कबुतरखाना बंद करण्यासंबंधी आदेश दिले होते. या प्रकरणाचा वाद अद्याप संपलेला नसून पुन्हा पुन्हा हा विषय डोके वर काढत आहे. त्यातच काही दिवसांपूर्वी बोरिवली येथील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या परिसरात एका जैन मंदिरालगत नवीन कबुतरखाना सुरू करण्यात आला आहे.

# नवीन वर्षात स्वयंचलित दरवाजे असलेली लोकल धावणार - रेल्वेमंत्री

■मुंबई। प्रतिनिधी:



धावत्या लोकलमधून पडून रेल्वे प्रवाशांचा मृत्यू आणि जखमी होण्याचे प्रमाण अधिक आहे. सर्वसामान्य नोकरदारांचा अशाप्रकारे अपघात होणे चुकीचे आहे. त्यामुळे नवीन वर्षापासून स्वयंचलित दरवाजे असलेली लोकल धावेल. मुंबईतील सध्या धावत असलेल्या लोकलला स्वयंचलित दरवाजे बसविण्यात येतील. तर, येत्या काळात २३८ नवीन रेक दाखल होणार असून, त्यामुळे ६० टक्के प्रवासी क्षमता वाढेल, असा विश्वास रेल्वेमंत्री आश्विनी वैष्णव यांनी व्यक्त केला. घणसोली येथील अतिरिक्त मध्यवर्ती बोगद्याच्या कार्यस्थळाला आश्विनी वैष्णव यांनी शनिवारी भेट दिली. यावेळी वैष्णव म्हणाले की, देशभरातून नागरिक मुंबईत नोकरीनिमित्त येतात. मुंबईच्या अर्थव्यवस्थेत आपले आर्थिक योगदान देतात. परंतु, दरवर्षी अनेक प्रवाशांचा धावत्या लोकलमधून पडून मृत्यू होतो. त्यामुळे यावर उपाय म्हणून लोकलला स्वयंचलित दरवाजे बसवण्यात येतील. वातानुकूलित लोकलला स्वयंचलित दरवाजे बसविण्यात आले आहेत. आता नवीन तयार होणाऱ्या सामान्य लोकलला स्वयंचलित दरवाजे बसविण्यात येतील. स्वयंचलित दरवाजांमुळे लोकलमधून पडून होणारे अपघात पूर्णपणे बंद होतील. वंदे भारत एक्स्प्रेसप्रमाणे नव्या लोकलमध्ये प्राणवायूचे प्रमाण अधिक असेल, असे वैष्णव म्हणाले.

मुंब्रा येथे जून २०२५ मध्ये लोकलमधून पडून प्रवाशांचा मृत्यू झाला होता. या घटनेनंतर आश्विनी वैष्णव आणि रेल्वे मंडळाच्या अधिकाऱ्यांनी इंटिग्रल कोच फॅक्टरी (आयसीएफ) सोबत बैठक घेतली. त्यानंतर, सामान्य लोकलच्या रचनेत बदल करून हवा खेळती राहील अशा पद्धतीची रचना करून डबा तयार करण्याचा, स्वयंचलित दरवाजे असलेली सामान्य लोकल चालविण्याचा निर्णय रेल्वे मंडळाने घेतला.

त्यानंतर, ऑगस्ट २०२५ मध्ये मध्य रेल्वेच्या कुर्ला कारशेडमध्ये सामान्य लोकलला स्वयंचलित दरवाजा असलेला नमुना डबा विकसित केला होता. सामान्य लोकलला स्वयंचलित दरवाजे बंद केल्यास, वायुवीजन कमी होऊन प्रवासी गुदरमतील. ही गंभीर समस्या लक्षात घेऊन यावर उपाय शोधण्यात आला. स्वयंचलित दरवाजांना लूव्हर्स (हवेशीर पट्ट्या) असतील. त्यामुळे या लूव्हर्समधून हवा खेळती राहील.

# बेरोजगारांना एसटीमध्ये मिळणार 30 हजार रुपयांची नोकरी


■मुंबई। प्रतिनिधी:

राज्य परिवहन महामंडळाच्या (एसटी) ताफ्यात आठ हजार नवीन बसगाड्या दाखल होणार आहेत. त्यामुळे एसटी महामंडळाला मनुष्यबळाची आवश्यकता भासणार आहे. यासाठी कंत्राटी पद्धतीने १७,४५० चालक व सहाय्यक पदासाठी भरती प्रक्रिया राबविण्यात येणार असून येत्या २ ऑक्टोबर रोजी निविदा प्रक्रियेला सुरुवात होणार आहे. या भरती प्रक्रियेच्या माध्यमातून राज्यातील हजारो बेरोजगार तरुण -तरुणींना रोजगार उपलब्ध होणार आहे. त्यांना किमान ३० हजार रुपये वेतन मिळणार आहे. या संधीचा होतकरू तरुण -तरुणींनी फायदा घ्यावा, असे आवाहन परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी केले आहे. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या ३०० व्या संचालक मंडळ बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार, बस सेवा सुरळीत ठेवण्यासाठी आवश्यक असलेले चालक व सहाय्यक तीन वर्षांसाठी कंत्राटी पद्धतीने घेण्याकरिता ई-निविदा प्रक्रिया अवलंबण्यात येत आहे. ही ई-निविदा प्रक्रिया सहा प्रादेशिक विभागांमध्ये राबविण्यात येणार आहे. प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर मनुष्यबळ पुरविणाऱ्या संस्थांकडून राज्य परिवहन महामंडळाला आवश्यक मनुष्यबळ वेळेत उपलब्ध होईल.

कंत्राटी पद्धतीने भरती होणाऱ्या चालक व सहाय्यक उमेदवाराला सुमारे ३० हजार रुपये वेतन देण्यात येईल. याबरोबरच उमेदवारांना एसटीतर्फे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. बसची वाढती संख्या आणि त्यासाठी लागणारे मनुष्यबळ मिळाल्यानंतर प्रवाशांना अखंड, सुरक्षित व दर्जेदार बस सेवा उपलब्ध करणे शक्य होईल, असा विश्वास सरनाईक यांनी व्यक्त केला.


# चोरलेल्या मोबाईलमधून पहिला डल्ला बँक खात्यावर; सोपा पासवर्ड चोरांच्या फायद्याचा

■मुंबई। प्रतिनिधी:



सेल फोन म्हणजेच मोबाईल फोन हा प्रत्येकाच्या आयुष्याचा भाग झाला आहे. ईमेल, व्हॉट्सअॅप, ऑनलाइन पेमेंट, गुगल किंवा जीपे हे सर्व मोबाईलमध्ये असल्यामुळे अलीकडच्या काळात खिशात पैसे न ठेवता केवळ मोबाईल सोबत घेऊन प्रवास करतात. मोबाईलमधून गुगल पे करताना प्रत्येकजण पासवर्ड ठेवतो. अनेकजण त्यांच्या सर्व बँकांसाठी गुगल पेसाठी एकसारखे सोपा पासवर्ड ठेवतात. हाच मोठा धोका आहे कारण तुमचा मोबाईल चोरीला गेला तर तुमचा सोपा (हएअङ ढं२६ङ्क१) पासवर्ड तुमचे बँक खाते रिकामे करू शकतो. कारण मोबाईल चोरीला गेल्यानंतर हे लोक पहिल्यांदा फोन अनलॉक करतात आणि लगेचच गुगल पेमधून पैसे ट्रान्सफर करतात. अशीच एक घटना नुकताच मुंबईत घडली आहे. चेंबूर गुन्हे शाखेने साकीनाकामधील एका मोबाईल दुकानावर शुक्रवारी छापा टाकला आणि धक्कादायक बाब म्हणजे आयएमईआय छेडछाडीचे रॅकेट उघड झाले. या प्रकरणात राम प्रसाद राजभर आणि गुलाम खान या दोघांना अटक करण्यात आली. हे आरोपी अॅप अनलॉक टूल या सॉफ्टवेअरचा गैरवापर करत होते. हे टूल ग्राहकांना मदत करण्यासाठी वापरले जाते. जे मोबाईलचे लॉक किंवा पिन विसरतात त्यांच्या मदतीसाठी हे सॉफ्टवेअर आहे. परंतु राम प्रसाद राजभर आणि गुलाम खान चोरीच्या मोबाईल फोनचा क्टएक नंबर बदलण्यासाठी याचा वापर करायचे. त्यामुळे मूळ क्टएक नंबर दूरसंचार विभागाच्या केंद्रीय उपकरण ओळख नोंदणीमध्ये कधीही सापडत नाही. मुंबईतील अनंत चतुर्थीच्या (6 सप्टेंबर) विसर्जन मिरवणुकीत मोठ्या प्रमाणात मोबाईल फोन चोरीला गेले. पोलिसांनी कौशल्याने शोध घेत दिल्लीतील चौघांकडून 45 मोबाईल फोन जप्त केले. हे आरोपी मुंबईत चोरलेल्या मोबाईल फोनचे क्टएक नंबर बदलून नेपाळमध्ये विकण्याचा कट रचत होते. तीन दिवसांपूर्वी, दिल्लीत 200 हून अधिक चोरीचे मोबाईल फोन जप्त करण्यात आले. यात अटक केलेल्या आरोपींपैकी एकाने मोबाईल दुरुस्तीच्या दुकानात काम केले होते. शुक्रवारी मुंबईत अटक केलेल्या दोन आरोपींप्रमाणेच तो मोबाईलचा लॉक ब्रेक करत होता. पोलिसांच्या म्हणण्यानुसार, मोबाईल फोन अनलॉक झाल्यानंतर, चोर गुगल पेमधून वेगवेगळे पासवर्ड वापरायचे. जर पासवर्ड योग्य असेल तर पैसे ताबडतोब आरोपींपैकी एकाच्या खात्यात ट्रान्सफर केले जात होते.

# चेंबूरमध्ये ओडीची चार-पाच वाहनांना धडक, सुदैवाने कोणीही जखमी नाही



■मुंबई। प्रतिनिधी:

चेंबूरमधील सिंधी सोसायटी परिसरात शुक्रवारी रात्री भरधाव वेगात आलेल्या एका ओडी मोटारगाडीने चार ते पाच वाहनांना धडक दिली. सुदैवाने या अपघातात कोणीही जखमी झाले नाही. मात्र वाहनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याची माहिती स्थानिक रहिवाशांनी दिली. दोन वर्षांपूर्वी चेंबूरमधील सिंधी सोसायटी परिसरात झामा चौक झ्र सुमननगर दरम्यान नवीन रस्ता तयार करण्यात आला आहे. मात्र अद्यापही हा रस्ता वाहतुकीसाठी खुला करण्यात आलेला नाही. त्यामुळे या रस्त्यालगत सध्या मोठ्या प्रमाणात वाहने उभी करण्यात येत आहेत. अनेक वाहनचालक या मोकळ्या रस्त्यावर भरधाव वेगाने वाहने चालवतात. एक महिला शुक्रवारी रात्री या रस्त्यावरून भरधाव वेगात ऑडी मोटारगाडी घेऊन जात होती. अचानक तिच्या वाहनासमोर एक श्वान आला. त्यामुळे या महिलेचा वाहनावरील ताबा सुटला. त्यानंतर या मोटारगाडीने रस्त्यालगत उभ्या असलेल्या चार ते पाच वाहनांना धडक दिली. सुदैवाने या अपघातात कोणीही जखमी झाली नाही. मात्र वाहनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. घटनेची माहिती मिळताच चुनाभट्टी पोलीस तत्काळ घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी महिला चालकाला ताब्यात घेतले असून याप्रकरणी पोलीस अधिक तपास करीत आहेत.


# बुलेट ट्रेनचे तिकीट मध्यमवर्गीयांना परवडेल – रेल्वेमंत्री आश्विनी वैष्णव

■मुंबई। प्रतिनिधी:

देशातील पहिल्या ५०८ किमी लांबीच्या मुंबई झ्र अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पाचे काम सुरू आहे. भविष्यात २.०७ तासात प्रवाशांचा प्रवास होईल. हा प्रकल्प मध्यमवर्गाच्या आकांक्षा पूर्ण करणार असेल. तसेच बुलेट ट्रेनचे तिकीट मध्यमवगार्ना परवडणारे असेल, असे रेल्वेमंत्री आश्विनी वैष्णव म्हणाले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या महत्त्वकांक्षी प्रकल्पापैकी एक असलेल्या मुंबई झ्र अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पाने ऐतिहासिक अभियांत्रिकी टप्पा गाठला आहे. घणसोली आणि शिळफाटा बाजूंनी एकाच वेळी खोदकाम करून ४.८ किमी लांबीचा बोगदा तयार करण्यात आला आहे. घणसोली येथील अतिरिक्त मध्यवर्ती बोगद्याच्या कार्यस्थळाला आश्विनी वैष्णव यांनी शनिवारी भेट दिली.

यावेळी वैष्णव म्हणाले की, मुंबई झ्र अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्प २०२९ पर्यंत पूर्ण होईल. सध्या या प्रकल्पाची कामे वेगात सुरू आहेत. ३२० किमीचा व्हायाडक्ट ( लांबलचक पूल) पूर्ण झाला. सर्व स्थानकांची बांधकामे वेगाने सुरू आहेत. नदीवरील पूल बांधण्यात येत आहेत. साबरमती बोगदा पूर्णत्वाकडे आहे. तसेच महाराष्ट्रातील कामे सर्वतोपरीने वेगात सुरू आहेत. प्रकल्पाच्या जवळील बांधकामे आणि सागरी पर्यावरणाला धोका होणार नाही, यावर विशेष लक्ष दिले जात आहे, असे वैष्णव म्हणाले.



बुलेट ट्रेन प्रकल्पामुळे मुंबई झ्र अहमदाबाद दरम्यानचा प्रवास फक्त २ तास ७ मिनिटांत पूर्ण होईल. बुलेट ट्रेन प्रमुख व्यावसायिक शहरांना जोडणार असल्याने, अर्थव्यवस्था वाढीस चालना मिळेल. टोकियो, नागोया आणि ओसाका सारख्या प्रमुख केंद्रांना जोडणाऱ्या जगातील पहिल्या बुलेट ट्रेनने जपानच्या संपूर्ण अर्थव्यवस्थेवर बहुआयामी परिणाम केला. त्याचप्रमाणे, हा प्रकल्प आणंद, अहमदाबाद, वडोदरा, सुरत, वापी आणि मुंबई यांना एकाच आर्थिक कॉरिडॉरमध्ये जोडेल. यामुळे एकात्मिक बाजारपेठ निर्माण होईल आणि या कॉरिडॉरवर औद्योगिक विकासाला गती मिळेल, असे वैष्णव म्हणाले.

बुलेट ट्रेन प्रकल्प २०२७ मध्ये सुरू करण्याचे उद्दिष्ट्य आहे. सुरत - बिलिमोरादरम्यानच्या पहिल्या विभागातील वाहतूक सर्वात आधी सुरू होईल. त्यानंतर २०२८ पर्यंत ठाणे आणि २०२९ पर्यंत वांद्रे-कुर्ला संकुलपर्यंत बुलेट धावू लागेल. सुरुवातीला गर्दीच्या वेळी दर ३० मिनिटांनी बुलेट ट्रेन धावेल. तर, दुसऱ्या टप्प्यात दर २० मिनिटांनी बुलेट ट्रेन धावले. त्यानंतर वाढती मागणी लक्षात घेऊन दर १० मिनिटांनी बुलेट ट्रेनची फेरी चालविण्याचे लक्ष्य आहे. प्रकल्पात व्यापक सुरक्षा उपायांसह प्रगत न्यू ऑस्ट्रियन टनेलिंग मेथडचा (एनएटीएम) वापर करण्यात येत आहे. सुरक्षित बांधकाम सुनिश्चित करण्यासाठी त्यात ग्राउंड सेटलमेंट मार्कर, पायझोमीटर, इनक्लिनोमीटर आणि स्ट्रेन गेज समाविष्ट आहेत.

# कर्तव्य बजावणाऱ्या पोलिसावर सुऱ्याने हल्ला, आरोपीचा शोध सुरू



■मुंबई। प्रतिनिधी:

ऍन्टॉप हिल परिसरात कर्तव्य बजावणाऱ्या पोलिसावर शुक्रवारी २७ वर्षीय तरूणाने सुऱ्याने हल्ला केला. या हल्ल्यात पोलीस शिपायाच्या हाताला सुरा लागल्यामुळे जखम झाली. आरोपीची ओळख पटली असून त्याच्याविरोधात ऍन्टॉप हिल पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तक्रारदार समाधान माने (३७) पोलीस शिपाई असून ते ऍन्टॉप हिल पोलीस ठाण्यात कार्यरत आहेत. पोलीस ठाण्याने हद्दपार केलेले सराईत आरोपी आपल्या परिसरात आल्याची पडताळणी करण्याचे काम माने यांना देण्यात आले होते. त्यासाठी ते बंगालीपुरा परिसरात गस्त घातल होते. त्यावेळी माने यांच्यासमोर अचानक मोहम्मद पीर मोहम्मद पठाण आला. तो माने यांना कामापासून परावृत्त करू लागला. त्याच्या हातात सुरा होता. त्यांनी आरोपीला समजावण्याचा प्रयत्न केला. परंतु आरोपी त्यांना शिवीगाळ करून लागला. त्यानंतर आरोपीने हातातील सुऱ्याने माने यांच्यावर हल्ला केला. त्याने सुरा माने यांच्या पोटात मारण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे माने यांनी स्वतःचा बचाव करण्याचा प्रयत्न केला असता त्यांच्या हाताला सुरा लागला. त्यामुळे रक्त येऊ लागले. हा प्रकार पाहिल्यानंतर स्थानिक रहिवासी माने यांच्या मदतीसाठी धावले. त्यावेळी आरोपीने त्यांनाही सुरा दाखवून मदत करण्यापासून परावृत्त केले. माने यांनी आरोपीला पकडण्याचा प्रयत्न केला. पण आरोपीने त्यांना धक्का देऊन पलायन केले. आरोपी मोहम्मद पीर मोहम्मद पठाण याच्या विरोधात सरकारी कामात अडथळा निर्माण केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. माने यांना शीव येथील लोकमान्य टिळक रुग्णालायत नेण्यात आले.

# गारगाई धरण अजूनही परवानगीच्या प्रतीक्षेत, वन विभागाच्या परवानगीची अद्याप प्रतीक्षा

■मुंबई। प्रतिनिधी:

पाण्याची वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी मुंबई महापालिकेने गारगाई धरण प्रकल्पाला गती देण्याचे ठरवले असले तरी या प्रकल्पाला अद्याप परवानगीची प्रतीक्षा आहे. वन्यजीव विभागाची राज्याची परवानगी मिळाली असून केंद्राची परवानगी बाकी आहे. तसेच वन विभागाची परवानगी अद्याप मिळालेली नाही.



मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या उर्ध्व वैतरणा, मोडक सागर, तानसा, मध्य वैतरणा, भातसा, विहार, तुळशी या सातही धरणांतून मुंबईला दर दिवशी ४००० दशलक्ष लिटर पाण्याचा पुरवठा केला जातो. मात्र मुंबईची लोकसंख्या वाढत असून पाण्याची वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी मुंबई महापालिकेने गारगाई, पिंजाळ व दमणगंगा हे तीन प्रकल्प राबविण्याचा निर्णय घेतला होता. या सगळ्या प्रकल्पांचे काम रखडले आहे. गारगाई धरणासाठी लाखो झाडे कापावी लागणार असल्यामुळे हा प्रकल्प पालिका प्रशासनाने बाजूला ठेवला होता. मात्र मध्य वैतरणा धरण २०१४ मध्ये बांधून पूर्ण झाल्यानंतर गेल्या दहा वर्षांत एकही नवीन धरण मुंबई महापालिकेने बांधलेले नाही. त्यातच समुद्राचे पाणी गोडे करण्याचा प्रकल्पही रखडला आहे. त्यामुळे पालिका प्रशासनाने गारगाई धरण प्रकल्पाला गती देण्याचे ठरवले आहे.

परवानग्यासाठी हा प्रकल्प गेल्या चार वर्षांपासून रखडला आहे. या प्रकल्पामुळे तानसा अभयारण्य बाधित होणार असून त्याकरिता वन्यजीव विभागाची परवानगी लागणार आहे. तसेच वन विभागाचीही परवानगी लागणार आहे. या परवानग्यांसाठी २०२० मध्ये अर्ज करण्यात आले होते. मात्र आतापर्यंत वन्यजीव विभागाची राज्याची परवानगी मिळाली असून केंद्राची परवानगी बाकी आहे. तर वन विभागाची परवानगी अद्याप मिळालेली नाही, अशी माहिती महापालिका अधिकाऱ्यांनी दिली.

मुंबईला पाणीपुरवठा करण्यासाठी सध्या सात धरणातील पाणीसाठ्यावर भिस्त आहे. सगळी धरणे कठोकाठ भरली असली तरी सलग तीन वर्षे मुंबईकरांवर पावसाळ्याच्या आधी पाणी कपात लागू करण्याची वेळ येते किंवा राखीव साठा वापरावा लागतो. त्यामुळे पालिकेने गारगाई धरण प्रकल्प पूर्ण करण्याचे ठरवले आहे.प्रकल्पासाठी परवानग्या मिळाल्यानंतर बांधकाम पूर्ण होण्यासाठी सुमारे चार वर्षे लागणार आहेत. या प्रकल्पासाठी ३१०० कोटी रुपये खर्च अपेक्षित असून परवानग्या रखडल्यामुळे हा खर्चही वाढण्याची शक्यता आहे.

मागणी आणि पुरवठ्यात तूट मुंबईत सध्या दररोज ४००० दशलक्ष लिटर पाणीपुरवठा केला जातो. प्रत्यक्षात आता मुंबईची दैनंदिन पाण्याची गरज ४६०० दशलक्ष लिटर इतकी आहे. गरगाई धरण झाल्यास ४४० दशलक्ष लिटर पाणी उपलब्ध होऊ शकणार आहे.

येत्या काळात मुंबईतील वाढत्या लोकसंख्येमुळे पाण्याची मागणीही वाढणार आहे. २०४१ पर्यंत मुंबईकरांच्या पाण्याची गरज ५९४० दशलक्ष लिटर इतकी होणार आहे. मात्र सध्या तरी सात धरणांव्यतिरिक्त दुसरा पर्याय नाही. मुंबईला सात धरणांतून पाणीपुरवठा होत असला तरी तो दिवसेंदिवस कमी पडू लागला आहे.

# वेश्या व्यवसाय करणाऱ्या पार्लरवर पोलिसांचा छापा, तिघांना अटक



■मुंबई। प्रतिनिधी:

मसाजच्या नावाखाली वेश्या व्यवसाय करणाऱ्या एका पार्लरवर शुक्रवारी पोलीस उपायुक्त कार्यालयामधील एका पथकाने छापा घातला. येथून दोन मुलींची सुटका करण्यात आली असून पार्लर चालवणाऱ्या तिघांवर गुन्हा दाखल करून त्यांना अटक करण्यात आली.

शीव - पनवेल महामार्गावरील देवनार परिसरात मारिया स्पा नावाचे पार्लर आहे. गेल्या काही दिवसांपासून येथे मासाजच्या नावाखाली वेश्या व्यवसाय सुरू असल्याची माहिती पोलीस उपायुक्त परिमंडळ ६ कार्यालयाला मिळाली होती. त्यानुसार पोलीस उपायुक्त पथकाने शुक्रवारी सायंकाळी पार्लरवर छापा घातला. यावेळी तेथे वेश्या व्यवसाय सुरू असल्याचे उघडकीस आले. वेश्या व्यवसाय करण्यास भाग पाडणाऱ्या एका महिलेसह दोघांविरोधात गोवंडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून त्यांना अटक करण्यात आली. यावेळी पार्लरमधून दोन मुलींची सुटका करण्यात आली.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४०००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com